
# धर्म, धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा

वसंत पळशीकर



MR 891.461 5
P 187 D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# धर्म, धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा

वसंत पळशीकर

लोकवाङ्मय गृह

**धर्म, धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा** / वसंत पळशीकर

Dharma, Dharmashraddha Ani Andhashraddha / Vasant Palshikar

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 P 187 D
00124285

म/८८४

© वसंत पळशीकर

पहिली आवृत्ती ⊙ : ऑगस्ट २००५

मुखपृष्ठ : राहुल मयेकर

मूल्य : १० रुपये

ISBN 81-88284-60-2

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

दि. के. बेडेकर यांच्या पुण्य स्मृतीस अर्पण!

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 P 187 D
00124285

# १

'धर्म, धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा' असा विषय मला दिला आहे. मानवी जीवनाच्या थेट मुळाशी भिडणारा हा विषय आहे. ठामठोकपणे काही मते मांडणे वा निष्कर्ष सादर करणे असे न करता आपल्या विचारार्थ काही मुद्दे उपस्थित करावेत आणि आपल्याबरोबर संवाद करावा असे माझ्या मनात आहे.

डावी, प्रागतिक, सेक्युलर विचारसरणी बाळगणाऱ्या उद्याच्या जगामध्ये धर्माला, धर्मश्रद्धेला काही प्रयोजन व कार्य उरणार नाही; कारण उद्याचे जग हे विज्ञान-तंत्रविज्ञानाने लख्खपणे उजळून गेलेले जग असणार आहे, अशी ज्यांची खात्री पटली आहे अशा मंडळींचे हे व्यासपीठ आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

आता, भारतीय लोक वृत्ती व व्यवहार या दोन्ही पातळ्यांवर धार्मिकतेने ओतप्रोत आहेत; शिक्षणाचा प्रसार झाल्यावरही, अगदी उच्च शिक्षितांमध्येही धार्मिकतेचा, पारंपरिक रूढींचा व व्यवहारांचा प्रभाव व पगडा आजही टिकून आहे, या आपल्या अनुभवाच्या गोष्टी आहेत. मध्यमवर्गीय-उच्चवर्गीय बुद्धिजीवी पांढरपेशा शहरी लोकांची धार्मिकता ज्या प्रकारे प्रकट होताना आढळते, तिने आपण सारेच अस्वस्थ होतो. शहाण्या, विचारी माणसाने अस्वस्थ व्हावे अशीच ती गोष्ट आहे. 'धार्मिकते'चा धंदा करणारी चलाख, बेरकी मंडळी पुष्कळ आहेत व शिरजोर पण आहेत. ग्रामीण पारंपरिक धार्मिकतेचे अनेक आविष्कार 'यातुप्रधान' (magical beliefs) धर्माचा पगडा फार मोठा असल्याचे दर्शवितात. धर्मवादी राजकारण ही शंभर-सव्वाशे वर्षांपासूनची आपली डोकेदुखी राहिलेली आहे. मुस्लीम लीगच्या नेत्यांनी केलेल्या धर्मवादी राजकारणामुळे फाळणी झाली. आज आता धर्मवादी हिंदुत्ववादी राजकारणाची भर पडली आहे. भारताचे ऐक्य, स्वास्थ्य व समृद्धी धोक्यात आणणारी धर्मवादी राजकारण ही गोष्ट आहे, मग ते कोणीही करो.

भारताची राज्यघटना 'धर्मनिरपेक्ष' (सेक्युलर) आहे, पण याने समस्या सुटलेली नाही. लोकांच्या जीवनात व मनात धर्मश्रद्धा व धार्मिकता एवढी ओतप्रोत

असल्यावर कागदावरची राज्यघटना अनेकानेक प्रसंगी व प्रकारे धाब्यावर बसविली जाते हा तर आपला अनुभव आहे. स्वायत्त लोकजीवनात धर्मश्रद्धा आविष्कृत होत राहतात आणि त्याचे सार्वत्रिक व व्यापक परिणाम होत राहतातच.

'धर्म' हा शब्द आपण सर्वजण सरावाने वापरतो. पण, धर्म हा शब्द कोणत्या अर्थाने घ्यावयाचा, असा प्रश्न जर विचारला तर गुंतागुंत लक्षात येते. ईसाई धर्म, इस्लाम धर्म असे आपण म्हणतो तेव्हा सैद्धान्तिक व व्यावहारिक रूपातील एक सुसंघटित धर्म आपल्यासमोर असतो. तेच आपण 'हिंदू धर्म' असे म्हणू लागलो तर अनेक अडचणी उत्पन्न होतात. सर्व हिंदूंचे दैवत एक नाही, दैवतशास्त्र एक नाही, एक धर्मग्रंथ नाही. मनुस्मृतीलाही तो दर्जा नाही, जो कुराण वा बायबलला आहे. सुसंघटित एक धर्मपीठ (चर्च) नाही. जात-जमात हे येथील पायाभूत वास्तव आहे, आणि धार्मिक आचार, कर्मकांड, विधी जात-जमातींचे वेगवेगळे आहेत.

धर्म हा शब्द हिंदूंच्या संदर्भात ख्रिश्चन, मुस्लीम, यहुदी या धर्मांच्या अर्थाने वापरता येत नाही ही एकच अडचण नाही. धर्म हा चार पुरुषार्थांपैकी एक मानला गेलेला आहे. त्याशिवाय जीवनात ज्या विविध स्थानांवर/भूमिकांमध्ये व्यक्ती वावरत असते त्या संदर्भातही धर्म शब्द वापरला जातो. राजाचा 'राजधर्म' असतो, पित्याचा 'पितृधर्म' असतो, इत्यादी.

विषय असा मोठा गुंतागुंतीचा, शेकडो पदर असलेला असल्याने यामधून एक मार्ग मी या व्याख्यानापुरता काढला आहे. प्रा. दि. के. बेडेकर यांनी त्यांच्या *धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार* या पुस्तिकेत (दुसरी आवृत्ती, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९५) केलेले विवेचन मी काही मुद्दे मांडण्यासाठी निवडले आहे. बेडकरांचे निधन झाल्याला एकतीस वर्षे होत आली. आयुष्याच्या एका टप्प्यावर ते कम्युनिस्ट चळवळीतील एक क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यांच्या पिढीतले ते एक स्वतंत्र बुद्धीचे सर्जनशील मार्क्सवादी विचारवंत होते. त्यांनी हा विषय त्यांच्या आयुष्यभराच्या चिंतनाचे सार म्हणून १९७२ साली एका व्याख्यानमालेच्या रूपाने मुळात मांडला. ही व्याख्याने मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. 'माणूस, आणि त्याने निर्माण केलेली संस्कृती' हा त्यांच्या आस्थेचा व अभ्यासाचा विषय होता. [त्यांचे आरंभीचे निबंध हे प्राचीन भारतीय ज्ञानमीमांसा (Epistemology),यज्ञसंस्था, यातुकल्पना व यातुक्रिया, वर्णव्यवस्था व पावित्र्य, अशा विषयांवर लिहिलेले होते.] १९७२ साली दिलेल्या व्याख्यानांचा एक संदर्भ भारतातील व जगातील समकालीन समाजस्थिती हा होता.

व्याख्यानांच्या ओघात एके ठिकाणी त्यांनी म्हटले, "श्रद्धेचा अस्त व पुनर्लाभ या दोन्ही बाबतींत अनेक गैरसमज उद्भवण्याचा संभव आहे, याची मला जाणीव आहे. माझ्या विचारांना मार्क्सवादाची पार्श्वभूमी आहे, त्यामुळे या गैरसमजाचा धोका दुहेरी आहे. एका बाजूने, श्रद्धेच्या बाबतीत मी जे म्हणेन ते 'जडवादी अश्रद्ध माणसा'ने मांडलेले व म्हणून संशयास्पद मानले जाईल. दुसरीकडे, श्रद्धा ही गोष्टच मानवी मनोव्यापारातून हद्दपार केली पाहिजे असे मानणारे बुद्धिवादी व मार्क्सवादी आक्षेपक मला 'श्रद्धेच्या फेऱ्यात परतलेला माणूस' म्हणून माझे म्हणणे अव्हेरतील. हा दुहेरी धोका दिसत असूनही तो पत्करून मला पुढचे विवेचन करावयाचे आहे." (पृ.२९-३०). असा दुहेरी धोका पत्करून आपल्याला काही गोष्टी समाजाला सांगितल्याच पाहिजेत असे त्यांना वाटत होते ही गोष्ट आपण ध्यानात ठेवूया.

त्या व्याख्यानमालेमध्ये त्यांनी असे म्हटले की, यापुढे जगाला सुख, शांती, समाधान लाभायचे असेल आणि व्यक्तिगत आणि सामाजिक मानवी जीवन, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर मानवी जीवन जर चांगले व्हायचे असेल, प्रगल्भ व्हायचे असेल, तर 'धर्मप्राय श्रद्धा' पुन्हा एकदा आपल्याला लाभावी लागेल. त्यांचे हे म्हणणे महाराष्ट्रात गंभीरपणे घेतले गेले नाही. यावर जेवढी सखोल चर्चा व्हायला पाहिजे होती तेवढी झाली नाही. हे आपल्या समाजाचे मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे. कारण हे विधान त्यांनी १९७२ साली केले. आज ३२ वर्षांनंतर आपल्यापुढे कोणते प्रश्न उपस्थित झाले आहेत हे आपणा सर्वांना माहीत आहे. ते धर्माशी निगडित आहेत आणि त्यांची सोडवणूक आपण योग्य रीतीने करू शकलो नाही तर या देशाला उज्ज्वल भवितव्य आहे का, असाही प्रश्न आपण गंभारपणे विचारू शकतो. बेडेकरांचे म्हणणे आपण विचारात घेतले असते—म्हणजे मान्य केले असते असे मी सुचवत नाही—, ते समजून घेतले असते, आणि आपल्या कामाची दिशा आणि वळण जर पुरोगामी, प्रागतिक, परिवर्तनवादी चळवळीने वेळीच बदलले असते तर, कदाचित आजची स्थिती आली नसती असे म्हणायला जागा आहे.

## २

उशिरा का होईना, आपण या विषयाकडे वळावे असे मला म्हणायचे आहे. आपल्या व्याख्यानाच्या आरंभीच बेडेकरांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आपल्याला दिसतो. हा मुद्दा काळाच्या कोणत्या टप्प्यापर्यंत मागे जाऊन ते करतात, हे बघण्यासारखे आहे. त्यांचे म्हणणे असे की, माणूस जेव्हा माणूस

म्हणून या पृथ्वीवर समाज करून राहू लागला, तेव्हाच माणसाने आपल्याभोवतीचे हे जे सबंध विश्व आहे त्या विश्वाच्या संबंधी स्वत:ला काही प्रश्न विचारले; किंवा असे म्हणूया की, त्याच्या मनात प्रश्न उपस्थित झाले. हे विश्व कुठून आले? हा सगळा जो पसारा आहे याचा हेतू काय? प्रयोजन काय? कोणत्या दिशेने त्याची वाटचाल चाललेली आहे? त्याचा माणसाच्या जीवनाशी काय संबंध आहे? अशा प्रकारचे कोड्यात टाकणारे प्रश्न माणसाला पडले. ते एकोणिसाव्या, विसाव्या शतकात पडले असे नाही. ते अगदी प्राचीनतम काळातल्या माणसालाही पडले. आपण ज्यांना जगातील आदिम किंवा आदिवासी जमाती म्हणतो त्यांच्या विचारांचा, सामाजिक संस्थांचा, जीवनाचा अभ्यास केला तर आपल्याला याचा पुरावा, पडताळा मिळतो. आफ्रिकेमध्ये एक न्यूर (Nuer) नावाची आदिवासी जमात आहे. एका मानवसंस्कृती शास्त्रज्ञाने या जमातीच्या धर्मविचारांसंबंधी एक पुस्तक लिहिले आहे. त्याची पृष्ठसंख्या ३५०-४००पाने आहे. म्हणजे, ही आदिम जमात आणि तिचा धर्मविचार हा ५-१५ पानांमध्ये गुंडाळून टाकता येईल इतका प्राथमिक अवस्थेतला असेल अशी जर आपली समजूत असेल, तर ती कशी खुळी आहे हे ते पुस्तक वाचल्यावर कळते. म्हणजे, त्याही जमातीतील मंडळींनी खूप खोलवर विचार केला आहे, असे लक्षात येते. जेव्हा हा अभ्यास झाला तेव्हा न्यूर जमातीचा आधुनिक जगाशी फारसा संबंध आला नव्हता.

आपण विचार केला तर आपल्याला हे दिसू शकते की, माणूसपण ज्या गोष्टींमध्ये सामावलेले आहे त्यांतूनच हे प्रश्न त्याच्या मनात उपस्थित होणे जवळ जवळ अटळ आणि स्वाभाविकही आहे. याकडेही बेडेकरांनी लक्ष वेधले आहे. माणसाला आत्मभान आहे. आणि आपल्याला आत्मभान आहे, याचेही भान माणसाला आहे. म्हणजे, नुसते आत्मभान नाही, नुसती संवेदना नाही, तर अमुक एक संवेदना आपल्याला होतेय याचे पण भान आहे. आणि पुढे असे की, याबद्दल आपण इतरांशी बोलू शकतो; म्हणजे इतरांबरोबर या विषयी संवाद होऊ शकतो, याचे पण भान आहे. हे प्रश्न मनामध्ये येणे ही गोष्ट माणसाच्या या स्वरूपाशी जोडलेली आहे. जर अशी संवेदनशीलता माणसामध्ये नसती आणि त्याच्यामध्ये आत्मभान नसते, जाणीव नसती तर कुठलेच प्रश्न मनामध्ये न येता त्याचे आयुष्य अतिशय व्यवस्थितपणे गेले असते. जसे इतर प्राण्यांचे जाताना आपण बाहेरून पाहतो. हे विधान मी मुद्दामच या पद्धतीने करतो आहे. कारण, खरे म्हणजे प्राण्यांची संवेदनशीलता आपल्याला कुठे माहीत आहे? आपण बाहेरून पाहून असे गृहीत धरतो की माणसाला जशी संवेदनशीलता आहे, आत्मभान आहे, तसे प्राण्यांना नाही. पण अलीकडे जे प्राण्यांच्या व्यक्तित्वाचे,

जीवनाचे, जाणिवांचे अभ्यास झाले आहेत त्यांच्यावरून असे लक्षात येते की, आपण मानतो त्याहून खूप अधिक संवेदनशीलता आणि आत्मभान प्राण्यांमध्येही आहे. आपण जर आपल्या घरात कुत्रे, घोडा वा गाय पाळत असलो तर याचा पडताळा आपल्याला येऊ शकतो. याच्या लहानमोठ्या कहाण्या लोकांनी लिहिलेल्या आहेत.

तेव्हा, माणसाची ही जी जाणीव आहे, आत्मभान आहे, त्यातून ही सगळी प्रक्रिया सुरू होते. मार्क्सवादी भूमिका बेडेकरांनी सोडून दिलेली नाही. हे सगळे मानवी आहे असे ते म्हणताहेत. म्हणजे ते कोणा ईश्वराला, देवाला मधे आणत नाहीत. त्यांनी म्हटलेय की, मी अजूनही नास्तिक आहे; पण मला श्रद्धेबद्दल बोलायचेय, बोलले पाहिजे. म्हणजे नास्तिक असणे, म्हणजे आज ज्या प्रकारे धार्मिक, भाविक लोक ईश्वराचे अस्तित्व मानतात तसे ते न मानणे, आणि श्रद्धेबद्दल बोलणे यात विसंवाद नाही, असे ते म्हणतात.

दुसऱ्या अंगाने जर विचार केला तर, आपल्या सर्वांसारखेच बेडेकरही सोळाव्या शतकानंतर उत्कर्ष पावलेल्या आधुनिक विज्ञानयुगात वाढले, राहिले आणि त्यांनी कार्य केले. त्या प्रभावापासून ते मुक्त नाहीत; त्यांना मुक्त व्हायचेही नाही. पण त्यांना असे दिसते, आणि त्यांचा अभ्यास बराच सखोल होता की, 'विज्ञान' काय करते? तर विश्वातील काही प्रकारच्या घडामोडी—ज्यांना आपण भौतिक असा शब्द वापरू शकतो—त्या कोणत्या नियमांनुसार घडतात त्या नियमांचा 'शोध' लावते; ते 'शोधल्या'वर वास्तवात तसे खरोखर अनुभवाला येतात का याचा पडताळा घेते आणि पडताळा आलेले जे नियम आहेत त्यांचे प्रामाण्य स्वीकारते. त्या नियमांचे जे ज्ञान आपल्याला होते त्याचा वापर करून आपल्याला अद्भुत परिणाम देणारे तंत्रविज्ञान आपण करतो आणि ते वापरतो.

वैज्ञानिक ज्ञान त्याच्या मर्यादेत चोख असते यात शंका नाही. पण काही प्रकारचे प्रश्न माणसाला पडतात, काही प्रकारचे निर्णय घेण्याचा प्रसंग येतो तेव्हा त्यांची उत्तरे विज्ञान आपल्याला देऊ शकत नाही. उदाहरणार्थ, हे विश्व कोणी, कधी व का, कोणत्या हेतूने उत्पन्न केले, या विश्वाचा नि मानवाचा काय संबंध असे प्रश्न विज्ञानाच्या चौकटीत उपस्थित होत नाहीत. ईश्वर अशी काही व्यक्ती वा तत्त्व वा शक्ती आहे का नाही, हा प्रश्नही वैज्ञानिक प्रश्न नाही.

माणसाला जगण्यासाठीदेखील जीवनार्थ शोधावा व अंगीकारावा लागतो. व्यक्ती व समूह, दोन्ही पातळ्यांवर 'आकार' आणि अर्थ यांच्या आधारेच माणसाला जगणे शक्य होते, व्यक्तित्वाची व समूहाची धारणा शक्य होते. विज्ञान कार्यकारणसंबंध उकलून समोर ठेवणारा नियम सांगेल; पदार्थाची रचना, द्रव्यघटक उकलेल, पण

ह्याचा जगण्याच्या संदर्भात अर्थ काय, बोध काय घ्यावा, श्रेयस्कर जगण्यासाठी कोणते अधिष्ठान पाहिजे, अशा प्रश्नांची उत्तरे विज्ञान देत नाही, देऊ शकत नाही. विज्ञानाची जी घडामोड (activity) आहे, त्यातून हे प्रश्न उपस्थित होऊ शकत नाहीत. विज्ञानाला अशा प्रश्नांशी देणेघेणे नाही. त्यामुळे वैज्ञानिक ज्ञान या प्रकारची मानवी जिज्ञासा किंवा शोध यांची पूर्तता करू शकत नाही; समाधान करू शकत नाही. निखळ 'वैज्ञानिक चौकटी'तून आपण सगळ्या गोष्टींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला, तर शेवटी आपल्याला या भूमिकेवर यावे लागते की, कशालाच खरे म्हणजे अर्थ नाही; अर्थ लावण्याचा, देण्याचा, गोष्टी अर्थगर्भ आहेत असे म्हणण्याचा हा जो खटाटोप आहे, तो केवळ भ्रामक आहे, व्यर्थ आहे.

आधुनिक विज्ञानाची भूमिका जर आपण प्रामाणिकपणे, काटेकोरपणे टोकापर्यंत नेऊन भिडवली, तर आपली स्थिती काय होते, आपण कोणत्या भूमिकेमध्ये येतो याबद्दल युरोपमध्ये गेल्या २०० वर्षांमध्ये पुष्कळ लिहिले गेले आहे. यातले बरेचसे साहित्यकृतींच्या स्वरूपात आलेले आहे. माणसाचा पृथ्वीवरील अवतार हा अर्थशून्य अपघात ठरतो. त्याच्या ठायी आढळणाऱ्या आत्मभान, जाणीव, भाषा, सर्जकता, कल्पनाशक्ती, तर्कबुद्धी इत्यादी अद्भुत क्षमता ओझी बनतात, जगायचे कशासाठी? हा प्रश्न भरीला पडतो, आणि त्याचे उत्तर विज्ञान देऊ शकत नाही. विज्ञानापलीकडे आपण गेलो तरच उत्तर मिळू शकते. माणसाची अंगभूत स्वभावप्रकृती अशी आढळते की अर्थपूर्णतेच्या, सार्थकतेच्या अभावी त्याला जगणे अशक्य होते. त्याच्या जाणिवेचा, आत्मभानाचा तो अंगभूत भागच आहे. त्याचे व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवरील जीवन जर सार्थक व्हायचे असेल, तर त्याला ती अर्थपूर्णता संपूर्ण विश्वामध्ये अनुभवाला, प्रत्ययाला यावी लागते.

ही गोष्ट माणूस कशी साधतो? बेडेकर असे म्हणतात की, शारीर, ऐंद्रिय संवेदना व निसर्गनियमांनी निर्धारित होणाऱ्या प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया व कृतिरूप प्रतिसाद या चौकटीत केवळ माणूस जगत नाही. जाणीवसंपन्न माणूस अंगभूत शारीर संवेदनांना, नैसर्गिक क्षमता व ठेवण यांच्या आधारे अर्थपूर्ण आकृतिबंधात बसवून मगच अनुभवतो. ही गोष्ट त्याच्याकडून स्वाभाविक अनिवार्यतेने घडते. माणसाला कल्पकता-प्रतिभा, संकल्पना करण्याची व गोष्टींना एका व्यामिश्र व्यूहरचनेत बांधण्याची शक्ती, विश्लेषक तर्कबुद्धी अशा विभिन्न शक्तींची/क्षमतांची देणगी लाभलेली आहे. माणसाचा मेंदू अंशतःच संगणकानुसार निसर्गदत्त आज्ञाप्रणालीनुसार काम करतो. वर उल्लेख केलेल्या विभिन्न क्षमता/शक्ती यांच्या

आधारे स्वेच्छा निवड व निर्णय करून माणूस कृती करतो, निर्मिती करतो.

बेडेकर त्यांच्या *धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार* या पुस्तकात म्हणतात, "धर्म हा मनोव्यापार आहे. तो खाजगी तसाच सामूहिक आहे... त्याचा विषय कोणता?... तो विषय माणूस ज्यात नांदतो ते विश्व आहे. विश्वाची उत्पत्ती कशी झाली? कशापासून झाली? कोणी केली? विश्वाचा निर्माता कोण? नियंता कोण? विश्वाच्या नियंत्याचे स्वरूप कसे आहे? तो विश्वात्मक आहे, का विश्वाच्या पलीकडे आहे? का विश्वात्मक असूनही पलीकडे आहे? विश्वाला सर्वंकष नैतिक नियमव्यवस्था आहे, का ते नीतिनिरपेक्ष आहे? विश्वात श्रेय-अश्रेय, सुख-दु:ख, वैषम्य आणि नैर्घृण्य अशी द्वंद्वे का आहेत? विश्व प्रेममय आहे, का प्रेमद्वेषाच्या द्वंद्वावर चालले आहे? असे हजारो प्रश्न माणसाच्या मनात येऊन गेले व आजही नांदत आहेत. या साऱ्या प्रश्नांत 'मानव आणि विश्व' हा धर्माचा सामान्य विषय आहे." (पृ.४-५)

ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे हा केवळ बौद्धिक जिज्ञासापूर्तीचा खेळ राहिला तर तो धर्म या व्यूहाला जन्म देऊ शकणार नाही. धर्म हा माणसांच्या वैयक्तिक व सामूहिक आचरणाशी घनिष्ठपणे जोडलेला मनोव्यापार व व्यूह आहे. तो इहलौकिक जीवनातील दैनंदिन आचरणाशी जोडलेला असतो; व्यक्ती म्हणून त्याची आणि तो ज्या समाजाचा घटक-सभासद असतो त्या समाजाची धारणा त्याच्या व त्याच्यासारख्या इतर घटक-सभासदांच्या आचरणातूनच होते.

जिला स्वतोमूल्य आहे अशी माणूस ही, एका अंगाने; व्यक्ती आहे तर, दुसऱ्या अंगाने, तिला असे मूल्य प्राप्त होण्यासाठीही ती एका समष्टीची—समाजाची—आणि संस्कृतीची घटक-सभासद असावी लागते. अनेकांगी व अनेक प्रकारच्या सामाजिक गोष्टींच्या माध्यमातून व्यक्ती इतर व्यक्तींशी स्वकीयत्वाच्या नात्याने जोडल्या जातात तेव्हाच एका समाजाच्या त्या घटक-सभासद बनतात.

माणूस ही काय चीज आहे ही गोष्ट जाणून घेण्यासाठी आपण प्रत्येकाने स्वत:मध्ये डोकावून पाहणे या टप्प्यावर पुरेसे ठरेल. आपले दैनंदिन इहलौकिक जीवन नानाविध गरजा व इच्छा (कामना) यांच्या पूर्तीच्या उद्देशाने चाललेले असते. याला उद्देशून आपण 'भौतिक जीवनव्यवहार' हा शब्दप्रयोग करूया. अनेकानेक माणसांच्या मिळून बनलेल्या समाजामध्ये यामधून आर्थिक-राजकीय-सामाजिक व्यवहार व व्यवस्था उत्पन्न होतात. आता, एक व्यक्ती जरी घेतली तरी, इच्छा व गरजा यांना धरबंद नसतो. कशाकशाची इच्छा करावी; किती इच्छा बाळगावी, 'स्वैर' इच्छा आणि 'विहित' गरज यांमध्ये फरक कसा करावा, असे अनेक प्रश्न अटळपणे उपस्थित होतात. वैयक्तिक व सामाजिक, दोन्ही पातळ्यांवर, निवड, विवेक, तारतम्य, नियमन व नियंत्रण यांची गरज आदिम मानवांनीही

अनुभवली असे दिसते. आपल्या पारंपरिक परिभाषेचा वापर करावयाचा तर, निव्वळ अर्थ व काम हे दोन पुरुषार्थ, ते जरी पायाभूत असले, त्यांना प्राधान्य असले तरी, पुरे पडत नाहीत. जीवनव्यवहारांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी, जीवनाला दिशा, आकार, वळण व लक्ष्य प्राप्त करून देऊन जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी 'धर्म' ह्या पुरुषार्थाची कल्पना व मांडणी करावी लागते. कारण नुसते जगता येत नाही, हा माणसाचा, माणूस म्हणून पेच व भोग आहे.

निवड, विवेक करण्यासाठी, तारतम्य पाळण्यासाठी निकष कसे प्राप्त होतात, हा प्रश्न आदिमतम मानव समूहांसमोर उपस्थित झाला असणार. 'बुद्धी वापरून', असे उत्तर आधुनिक शिक्षित माणसाला चटकन सुचते. पण बुद्धीचा, विवेकशक्तीचा वापर करण्यासाठीही प्रथम काही तत्त्वे/मूल्ये 'आदि गृहीततत्त्वे' (axioms) म्हणून हाताशी असावी लागतात. व्यक्तीला येणाऱ्या साक्षात अंत:प्रत्ययाच्या, त्याला घडणाऱ्या साक्षात 'दर्शना'च्या/'प्रकटना'च्या द्वारा ही आदि गृहीततत्त्वे/मूल्ये त्याला गवसतात.

मानव व विश्व यांच्या संबंधात माणसाला पडत आलेल्या ज्या प्रश्नांचे विवेचन बेडेकरांनी केले आहे, त्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध आणि वरील आदि गृहीततत्त्वे/मूल्ये यांचे 'गवसणे' ह्यांचा जैव संबंध आहे. आदि गृहीततत्त्वे/मूल्ये यांचे अधिष्ठान व्यक्ती व समाज यांच्या धारणेसाठी अत्यावश्यक असल्याचा अंत:प्रत्यय, आणि म्हणून त्या आदि गृहीततत्त्वे/मूल्ये यांचा नि:संदेह श्रद्धापूर्वक व्यक्ती व समूह यांच्याकडून स्वीकार अशी ही प्रक्रिया राहिलेली दिसते. ऐंद्रिय संवेदनांपासून लाभणाऱ्या ऐंद्रिय अनुभवांच्या आधारे आदि गृहिततत्त्वे/मूल्ये निष्पन्न करता येत नाहीत. ऐंद्रिय अनुभवांना 'उल्लंघून' जाऊनच (transcend करून) माणूस त्यांच्यापाशी 'पोचतो'. त्यांच्या श्रद्धापूर्वक स्वीकारामुळे व्यक्ती व समाज यांना, त्यांच्या सर्व जीवनव्यवहारांना आशय व आकार प्राप्त करून देता येतो; सुव्यवस्था, स्थैर्य व समाधान यांचा लाभ होतो, याची साक्षात अनुभूती आदिम काळातही माणसांनी अनुभवली असली पाहिजे. म्हणूनच धर्म नावाच्या गोष्टींचा आढळ सर्व लहान-मोठ्या, प्राचीन-अर्वाचीन समाजांमध्ये होतो.

येथे लक्षात घेण्याची गोष्ट अशी की, आशय व आकार ह्या दोन्ही बाबतीत, 'धर्म' सर्वत्र एकाच रूपात आढळत नाही. आणि तरीही भेदांना व वैविध्यांनाही उल्लंघून जाणाऱ्या काही गोष्टी जवळपास सर्व धर्मांमध्ये सारख्या आढळतात, आणि ही गोष्ट स्वाभाविकही आहे. दैनंदिन जगणे शक्य व्हावे, ते जगणे अर्थपूर्ण, शुभ व सुंदर असावे ही इच्छा/गरज हा मूळ स्रोत सर्व मानवांच्या संदर्भात सारखाच आहे ना!

बेडेकरांनी म्हटले आहे, ‘‘जेव्हा मानवाच्या मनात अशी उल्लंघित सर्वंकष श्रद्धा उद्‌भवते, तेव्हा धर्माच्या बीजाचा, प्रारूपाचा उदय होतो. ही श्रद्धा जर मानवी मनाच्या स्वभावात, वैशिष्ट्यातच असेल तर तिचा उदय मानवी प्राण्याच्या अस्तित्वाबरोबरच झाला असे मानणे रास्त होईल. मी तसेच मानणे योग्य समजतो.’’ (पृ.३). बेडेकर ‘उल्लंघित’ हा शब्द विचारपूर्वक वापरतात.

ज्याला आपण निसर्गसृष्टी म्हणू त्या निसर्गसृष्टीच्या उत्क्रांतीच्या ओघात माणसाचा अवतार पृथ्वीवर झाला, हा डार्विनने मांडलेला उत्क्रांतिवादाचा सिद्धान्त बेडेकर स्वीकारतात. ईश्वरविषयक ख्रिश्चन सिद्धान्त डार्विनचा सिद्धान्त एका अंगाने नाकारतो. वैज्ञानिक चौकटीचा आधार घेऊन विचार केला तरी डार्विनचा मूळ सिद्धान्त जसाच्या तसा ग्राह्य मानण्यात अनेक अडचणी आहेतच. त्या आपण तूर्त बाजूला ठेवूया. (निसर्गसृष्टीच्या उत्क्रांतीचे गूढ पूर्णपणे उकलत नाही ते नाहीच. असो.). माणूस नावाचा प्राणी एका टप्प्यावर अवतीर्ण झाला. त्या प्राण्याच्या ठायी काही क्षमता, गुणवैशिष्ट्ये विकसित होण्यास लाखो वर्षांचा अवधी लागला. या क्षमता व गुणवैशिष्ट्ये यांचा विकास मेंदूच्या विकासाशी निगडित आहे. विकसित स्वरूपाच्या वानर प्राणिजातीमधून या क्षमता-गुणवैशिष्ट्यांसह माणूस सिद्ध झाला. हा बेडेकरांच्या संपूर्णतया मानवकेंद्री मांडणीचा प्रारंभबिंदू आहे.

मानवाच्या ठायी ‘मन’ (mind) नावाची एक गोष्ट आहे. निसर्गसृष्टीकडून त्याला लाभलेली ही विलक्षण सामर्थ्य असलेली शक्ती आहे. मानवप्राण्याच्या शरीरापासून वेगळी काढता येते अशी ती गोष्ट नाही, पण मेंदू या अवयवामध्ये तिचे क्षपण (reduction) करता येत नाही. आज अनेक वैज्ञानिक विज्ञानाच्या चौकटीमध्ये व विज्ञानाची रीत वापरून मन आणि मनोव्यापार यांचे रहस्य जाणून घेण्याचा निकराचा प्रयत्न करीत आहेत. मेंदूत घडणाऱ्या रासायनिक-भौतिक क्रियांच्या परिभाषेत मनोव्यापार चित्रित करण्यापर्यंत विज्ञान पोचले आहे. पण मनात अमुक एक विचार, भावना, इच्छा विकार उत्पन्न का व कसा होतो हे वैज्ञानिक पद्धतीने उलगडू शकत नाही, ही मर्यादा राहतेच.

इहलौकिक जगण्याचा संदर्भ बेडेकर एका क्षणासाठीदेखील सोडत नाहीत. त्यांना असे आढळले की माणसाचे सर्व मनोव्यापार हे भौतिकीच्या नियमांमध्ये ‘बसविता’ येत नाहीत. त्यांच्यात एक ‘उल्लंघन’ (transcendence) आढळते. तेवढ्यापुरता माणूस निसर्गनियमांपासून मुक्त असतो, तो निसर्गनियम मोडतो असे होत नाही. पण मग काय घडते, ‘उल्लंघून’ जाणाऱ्या या शक्तीचे मूळ निसर्गनियमांच्या जटिल व्यूहात कोठे आहे, ही शक्ती कशी काम करते, हे कळत

नाही. पण मनोव्यापार ही आपल्या प्रत्ययाची गोष्ट आहे. त्यांचे सत्यत्व नाकारणे शक्य नाही.

व्यक्ती म्हणून मानवाची आणि समाज म्हणून मानवी समूहाची धारणा शक्य होण्याचा आणि मानवाच्या मनात उल्लंघित सर्वंकष श्रद्धा उद्‌भवण्याचा अनिवार्य संबंध बेडेकरांना अनुभवाला येतो. बेडेकरांची ही जाण विलक्षण प्रगल्भ आहे.

आदिम कालापासून थेट आजर्यंत व्यक्ती व समष्टी अशा दोन्ही पातळ्यांवर एक समस्या माणसापुढे पुन:पुन्हा उपस्थित होत आलेली त्यांना दिसते. व्यक्ती घेतली तर, तिच्या व्यक्तित्वाची अभंगता, स्वास्थ्य, समग्रता ही सहजसाध्य गोष्ट नाही हा अनुभव आपल्याला येतो. परस्परांशी मेळ न खाणाऱ्या, एकमेकांना छेद देणाऱ्या इच्छा, वासना, विकास, प्रेरणा, उद्दिष्टे व्यक्तीच्या ठायी असतात; ह्यांसहच तो जणू जन्माला येतो. आतल्याआत व्यक्ती अंतर्विरोध, ताणतणाव, रस्सीखेच, दुभंगणे-तिभंगणे व तुकडे पडणे इत्यादी अनुभवीत राहते. यावर मात करून स्वत:च्या व्यक्तित्वाची अभंगता, स्वास्थ्य, समग्रता तिला पुन:पुन्हा निर्माण करावी लागते. सुखासमाधानाने जगण्यासाठी ऊर्जा व मन:शांती संपादित करावी लागते. एरवी माणूस पागल बनतो, उरी फुटतो. अशीच गोष्ट समूहाच्या पातळीवरही आढळते. मानवजातीच्या इतिहासाच्या आरंभीच्या अवस्थेत, प्रदीर्घ काळपर्यंत, समाज म्हणजे रक्ताच्या नात्यांनी परस्परांशी जोडलेला एक गोतावळाच असे. अशा समाजाच्याही अभंगतेची, स्वास्थ्याची व समग्रतेची समस्या व्यक्तीच्या पातळीवरील समस्येशी तुल्यबळ असे. थोडक्यात, व्यक्ती व समाज, दोन्ही पातळ्यांवर एकत्वाचे पुन:पुन्हा संभरण होत राहावे लागते, ही माणसाची एक पायाभूत गरजच आहे. बेडेकरांचे म्हणणे असे की, माणसाचे माणूसपण टिकून आहे तोपर्यंत ही गरज राहणारच, आणि गरजेची पूर्तता करावीच लागणार.

मानव, मानव समाज व संस्कृती यांचा समग्र अभ्यास करणारे शास्त्र म्हणून अँथ्रापॉलॉजी (Anthropology) हे सामाजिक शास्त्र एकोणिसाव्या शतकात उदयास आले. जगभराच्या आदिम समाजांच्या निरीक्षण-अभ्यासाच्या आधारे त्याची बांधणी झाली. बेडेकरांना मानवाविषयी असीम व सर्वंकष आस्था होती, उत्कट जिज्ञासा होती. मानवी स्वभावप्रकृतीला अनुसरून माणसाने स्वत:चे जीवन सार्थक करण्याच्या ओघात, ऐंद्रिय अनुभवांच्या मर्यादेत बांधून न राहता, त्यांना उल्लंघून स्वत:च्या मनोव्यापारांना व जीवनव्यवहारांना काही आकार दिले, त्यात आशय भरला. ज्याला आपण 'धर्म' म्हणतो तो आकार हा एक विशेष स्वरूपाचा मनोव्यापार व व्यवहार आहे, असे त्यांचे म्हणणे. 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धेचा आढळ' त्यात बेडेकरांना होतो. ते म्हणतात, ''धार्मिकता अनुभवणारी व धार्मिकतेने आचरण

करणारी माणसे एका उल्लंघित श्रद्धेने जीवनाचा आणि विश्वाचा अनुभव घेतात व आचरण करतात, हे आपल्याला दिसेल.'' (पृ.२). प्राचीनकालीन यज्ञसंस्थेचा बेडेकरांनी विशेष खोलात जाऊन अभ्यास केला होता. प्राचीन आदिम समाजांमध्ये आढळणाऱ्या नरमेधासारख्या प्रथांचा, आदिम समाजांमध्ये आढळणाऱ्या धर्मश्रद्धा, धार्मिक संकल्पना, रीतिरिवाज, उत्सव यांचाही त्यांनी सहृदयतापूर्वक अभ्यास केला होता.

*धर्मश्रद्धा: एक पुनर्विचार*मधील या विषयाच्या बेडेकरांच्या विवेचनाशी मी पूर्णतया सहमत नाही. 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धे'चा आधार मानवी व्यक्ती व समूह यांचे एकत्व, अभंगत्व, स्वास्थ्य व समग्रता निर्माण करण्यासाठी व टिकवून धरण्यासाठी अत्यावश्यक असतो; या गोष्टींचे पुन:पुन्हा संभरण करावे लागते, ऊर्जा पुन:पुन्हा निर्माण/मुक्त करावी लागते व 'धर्मा'चे एक प्रयोजन हे आहे, असे सूचन त्यांच्या विवेचनात आहे व त्याच्याशी मात्र मी पूर्ण सहमत आहे.

आधुनिकपूर्व सर्व समाज अमर-नश्वर, पवित्र-अपवित्र, इहलौकिक-पारलौकिक, पौरुषेय-अपौरुषेय असा भेद करीत आले आहेत याचीही नोंद बेडेकर करतात. कोणत्या गोष्टी अमर, पवित्र, पारलौकिक, अपौरुषेय याचे एकच एक उत्तर जगभरच्या मानवी समाजांनी दिले असे आढळत नाही. पण असा भेद करण्याची गोष्ट मात्र जगभर आढळते. याचे रहस्य काय? परत परत सुसंवाद, मेळ, ऐक्य प्रस्थापित करण्याचे कार्य साधले तर पाहिजे, पण ते साधायचे कसे? विवेक करण्यासाठीही हे योग्य, हे शुभ, हे चांगले हा भेद करण्याचे निकष हाताशी असावे लागतात आणि ते सर्वांनी निरपवाद प्रमाण म्हणून स्वीकारलेले असावे लागतात. केवळ तर्कबुद्धीने तेथपर्यंत पोचता येत नाही, कारण एकाचा तर्क दुसरा खोडू शकतो; किंवा 'तुला असे वाटत असेल, पण मला वेगळे वाटते' किंवा, 'तुझे म्हणणे मी नाही जुमानणार' असे समोरची व्यक्ती/समूह म्हणू शकते. ही अडचण प्राचीनतम काळीही आलीच असणार. पवित्र-अपवित्र, पौरुषेय-अपौरुषेय या भेदांची निर्मिती या गरजेपोटी झाली असेल. काही प्रकारचे ज्ञान हे साक्षात् दर्शनाच्या—साक्षात्काराच्या—पद्धतीने होते वा पारलौकिक/अपौरुषेय प्रकटनांच्या रूपात होते; असामान्य (abnormal वा superhuman) क्षमता/देणगी असलेल्या काही व्यक्तींच्या मार्फत ते उपलब्ध होते आणि या ज्ञानाचा नि:संदेह श्रद्धेने स्वीकार सर्व समूहाने करावयाचा असतो, हा निर्णय मग ओघानेच येतो. गौतम बुद्धांच्या दीर्घ घोर तपश्चर्येच्या शेवटी त्यांना 'बोधी' झाली; जीवनाविषयीची सनातन 'आर्य सत्ये' (eternal verities) त्यांना साक्षात् कळली. मग त्यांनी त्यांच्या आधारे समाजाला शिकवण दिली. बेडेकरांनी १९४९ साली लिहिलेल्या

लेखाचे शीर्षक `The Revelatory Character of Indian Epistemology' असे मोठे अन्वर्थक आहे. 'धर्म' या गोष्टीचा जो वैशिष्ट्यपूर्ण आकार आहे तो त्याला 'नि:संदेह श्रद्धे'मुळे प्राप्त होतो. ''जेव्हा मानवाच्या मनात अशी उल्लंघित सर्वंकष श्रद्धा उद्‌भवते, तेव्हा धर्माच्या बीजाचा, प्राग्रूपाचा उदय होतो'' असे बेडेकरांनी म्हटले आहेच.

तात्पर्य, व्यक्ती व समाज यांचे एकत्व व अभंगत्व, स्वास्थ्य, समग्रता यांसाठी सर्वंकष श्रद्धेने नि:संदेहपणे सर्वांकडून स्वीकृत गोष्टी आधाराला लागतात. काही गोष्टी अमर, पवित्र, पारलौकिक, अपौरुषेय ठरविण्याने त्यांना प्रामाण्य प्राप्त होते. ते समाजातील सर्वांना स्वीकृत होऊ शकते. म्हणजे, खरे तर, आपण असे म्हणायला हवे की, व्यक्ती व समाज दोन्हींची धारणा मुळात सर्वंकष, नि:संदेह श्रद्धेने किमान काही गोष्टी स्वीकारण्यानेच साध्य होते.

धर्म नावाचा मनोव्यापार व लौकिक व्यवहार याला विशिष्ट आकार जगभर का प्राप्त झालेला आढळतो यांचे उत्तर आपणास आता मिळू शकते.

## ३

भारतातील विज्ञानवादी, बुद्धिप्रामाण्यवादी असे म्हणतील—व म्हणतातही—की आदिम व आधुनिकपूर्व, आंधळ्या, धार्मिक, भाविक व्यक्ती व समाज यांच्या बाबतीत हे सर्व खरे असेलही. पण आज आपण सारेच युरोपीय प्रबोधनानंतरच्या (Enlightenment) आधुनिकतेच्या आणि विज्ञानाच्या युगात राहतो आहोत, आणि या युगाने सारी समीकरणे बदलून टाकली आहेत. तर, ह्याचाही विचार आपल्याला करावयास हवाच.

आधुनिकता आणि आधुनिक विज्ञान यांचा जिवाशिवाचा संबंध आहे. या दोहोंची जडणघडण पाश्चिमात्य जगात झाली.

आजच्या अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, मानव व मानव संस्कृतिशास्त्र (Anthropology) यांचा उदय व उत्कर्ष आधुनिक युगातच झाला. आधुनिकता आणि विज्ञान या दोहोंना संघटित व प्रबळ ख्रिश्चॅनिटीशी संघर्ष करावा लागला. सर्व चिकित्सेचा आरंभ धर्मचिकित्सेपासून होतो, या अर्थाचे मार्क्सचे सुप्रसिद्ध वचन आहे. ख्रिश्चन धार्मिक सिद्धान्तांची (Christian dogma) पकड ढिली केल्याखेरीज युरोपीय समाजामध्ये आधुनिकता व विज्ञान यांचा उत्कर्ष अशक्य होता.

आधुनिक युगाच्या आरंभी साहसी दर्यावर्दींनी पृथ्वीच्या अनेक भागांचा शोध लावला. विभिन्न भूप्रदेशातील लोकांना अंकित केले. या लोकांच्या जीवनाचे

निरीक्षण-विश्लेषण करण्याचेही काम हाती घेतले. त्यांना परिचित असलेल्या यहुदी, इस्लाम व ईसाई या धर्मांचे नमुने प्रमाण मानून, धर्मासंबधी त्यांवरून विशिष्ट कल्पना करून व दृष्टिकोन बाळगून युरोपियांनी जगभरच्या लहानमोठ्या जमाती व समाज यांच्या 'धर्मा'चा अभ्यास केला. निष्कर्ष काढले.

रानटी अवस्थेपासून आरंभ करून ज्ञान, कौशल्य, समज, कर्तृत्व या निकषांवर मानवजातीचा क्रमश: विकास होत चालला आहे, या एकरेषीय वाटचालीच्या मार्गावर पश्चिम युरोपमधील समाज सर्वात प्रगत व प्रबुद्ध आणि त्यांचा ईसाई धर्म हा सर्वात उन्नत व खरा, अशी मान्यता तत्कालीन युरोपीय विद्वत्‌वर्तुळात सार्वजनिक आढळते. प्रबोधनयुगात, एका बाजूला, मानवाच्या मुक्तीसाठी धर्म या गोष्टीचेच मानवी जीवनातून उच्चाटन करायला हवे अशी भूमिका पुढे आली. दुसऱ्या बाजूला, धर्मही उत्क्रांत, उन्नत, विवेकाधिष्ठित प्रगल्भ बनत गेला आहे—विशेषत: खिश्चॅनिटी—ही भूमिका पुढे आली.

बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकवादी परिप्रेक्ष्यानुसार रानटी अवस्थेत माणूस अज्ञानी व दुबळा होतो. त्याला अनाकलनीय असणाऱ्या नैसर्गिक शक्ती, घडामोडी, उत्पात आदींनी तो भयचकित व दिङ्‌मूढ होत असे. त्याला सुरक्षित व आश्वस्त वाटत नसे. कार्यकारणसंबंधांची वैज्ञानिक उकल त्याला नव्हती. त्याची विचार व तर्क करण्याची पद्धती अ-विवेकी व अ-वैज्ञानिक (irrational, unscientific) व या अर्थाने यातुनिर्भर (magic ridden) होती. निसर्गसृष्टीतील सुष्ट-दुष्ट लहरी शक्तींची कल्पना त्याने केली आणि त्यांना संतुष्ट राखण्यासाठी अनेकानेक विधी, कर्म, कांड, रीतीभाती प्रमाणित केल्या. धर्माचा उदय कसा झाला याची ही प्रबोधनाच्या विचारप्रणालीनुसार शिष्टमान्य मांडणी आहे.

काळाच्या ओघात मानवजातीची प्रगती होत गेली. ती जगभरच्या सर्व समाजांची सारख्याच गतीने झाली असे नाही. अनेक समाज थेट सतराव्या-अठराव्या शतकापर्यंत 'रानटी' अवस्थेत राहिले. काही समाज प्रगती पावले. पण आधुनिक विज्ञान-तंत्रविज्ञानाचा अंगीकार नसलेल्या, ख्रिश्चॅनिटी हा उन्नत धर्म न पाळणाऱ्या, आधुनिकपूर्व, प्रबोधनपूर्व टप्प्यावरील हे प्रगत समाजदेखील अंधश्रद्धांनी ओतप्रोत धर्माच्या पकडीतच राहिले. ही जगभर साम्राज्ये प्रस्थापित करणाऱ्यांची ठाम धारणा राहिली.

इस्लामच्या झंझावाती विस्ताराच्या तडाख्याखाली १४५३ मध्ये कॉन्स्टॅंटिनोपलचा पाडाव झाल्यावर युरोपात धर्म, राजकारण, बौद्धिक-सांस्कृतिक व्यवहार या क्षेत्रांत बंडखोर शक्ती उत्पन्न झाल्या. त्यांनी रोमन कॅथॉलिक चर्च या ख्रिश्चन धर्मपीठाच्या सर्वंकष सत्तेला वेगवेगळ्या अंगांनी आवाहन दिले. रनेसाँ

(Renaissance), प्रोटेस्टंट रेफर्मेशन या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या बौद्धिक-सांस्कृतिक, धार्मिक घडामोडी, केंद्रिभूत प्रबळ राजसत्तांचा उदय व उत्कर्ष, युरोपीय राष्ट्रांचा जगभर साम्राज्यवादी विस्तार, जागतिक अर्थव्यवस्थेची पायाभरणी, आधुनिक विज्ञानाचा उदय व त्यामुळे घडून आलेले मतांतर या सगळ्या शक्तिप्रवाहांचा, चहूबाजूंनी झालेल्या आघातांचा परिणाम म्हणून ख्रिश्चन धर्माचा प्रभाव ओसरत गेला. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आधुनिक विवेकवादाचे अधिष्ठान खिर्श्चनिटीला देण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले गेले.

'धर्माचा अस्त' असा बेडेकरांच्या एका व्याख्यानाचा विषय होता. पण आजही युरोपीय समाज बव्हंशी ख्रिश्चनधर्मीय आहेत. पण आपण असे म्हणू शकू की, ते जो ख्रिश्चन धर्म मानतात व पाळतात त्याचा आकार नि:संदेह, सर्वंकष श्रद्धाव्यूह असा नाही. आधुनिकता, विज्ञानवाद व इहवाद यांनी श्रद्धाव्यूह बराचसा उखडला गेलेला आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या दोन-सव्वादोनशे वर्षांमध्ये, विज्ञानयुगामध्ये, 'सायंटिफिक रीझन'च्या उपलब्धीनंतर धर्म नावाच्या गोष्टीचा उच्छेदच करणे अगत्याचे आहे, ही भूमिका आग्रहपूर्वक मांडणाऱ्या वैचारिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळी उत्पन्न झाल्या. खुद्द बेडेकर धर्माच्या उच्छेदाची प्रतिज्ञा करणाऱ्या कम्युनिस्ट चळवळीत दीर्घकाळ सक्रिय होते. साम्यवादी राजवटींनी पद्धतशीरपणे व निर्घृणपणे लोकांवर धर्माचे पालन करण्याची बंदी पण घातली. शिक्षणव्यवस्थेच्या माध्यमातून नास्तिकता रुजविण्याचा कार्यक्रम राबविला. साम्यवादी राजवटींमध्ये अलीकडे जे आमूलाग्र परिवर्तन घडून येत आहे त्यामधून ही गोष्ट समोर आली आहे की लोकांमधली धार्मिकता लोप पावलेली नाही.

'धर्माचा अस्त' या व्याख्यानाच्या शेवटी बेडेकर म्हणतात, "युरोपियन समाजातील व्यक्ती व समूह, विचारवंत आणि सामान्य लोक, यांच्या जीवनविषयक श्रद्धा या महायुद्धांमुळे हादरून गेल्या... युरोपातला धर्मश्रद्ध माणूस आज आपल्या श्रद्धेबद्दल बोलताना पूर्वीच्या आत्मविश्वासाने बोलत नाही, तर विनीत भावनेने व साशंकतेने बोलतो, ख्रिस्ती धर्माव्यतिरिक्त नांदणाऱ्या इतर धर्मांच्या श्रद्धांबद्दल जिज्ञासेने पाहू लागतो, आणि सर्व धर्मीयांमध्ये संकर व्हावा अशी मनोमन इच्छा करतो. या घटनेचे मर्म धर्मश्रद्धेच्या क्षीणतेत आहे... हे सारे घडत आहे याच्या बुडाशी मानवी संस्कृतीमधील एका मूलभूत परिवर्तनाची बीजे आहेत. युरोप-अमेरिकेतच नव्हे तर बाकीच्या जगातही श्रद्धेचा ऱ्हास झालेला आहे. धर्मश्रद्धा साधन बनून, राष्ट्रीय अस्मिता व राजकीय सत्तालोलुप संघर्ष यांच्या गदारोळात गुरफटून गेली आहे, श्रद्धेचे मूळ स्वरूप ती केव्हाच गमावून बसली आहे." मग बेडेकर काही

प्रश्न उपस्थित करतात, ''धर्मश्रद्धेची जागा विज्ञानावरील निष्ठेने भरून येईल का? या ना त्या सामाजिक तत्त्वज्ञानावरील व क्रियाप्रवणतेवरील निष्ठा ही मानवी धर्मश्रद्धेचे नवे रूप होऊ शकेल का? कलात्मक सर्जन व कलेतील मग्नता ही नवी श्रद्धा होऊ शकते का? असे प्रश्न आज सार्थ वाटत आहेत, कारण धर्मश्रद्धेचा अस्त होऊन एक पोकळी निर्माण झाली आहे. मानवी जीवनात ही पोकळी राहण्याने काही बिघडणार नाही, श्रद्धेची गरजच नाही, असे काही जण म्हणतील तर काही जणांना ही पोकळी राहू नयेसे वाटेल. पण आज सर्वांना पोकळी जाणवत आहे; ही गोष्ट नाकारता येत नाही.'' (पृ.३२-३३).

बेडेकरांच्या मृत्यूला तीस वर्षे झाली. विज्ञान-तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रातील घोडदौड जास्तच वेगाने घडत आहे. जगातले काही समाज असे आहेत की ज्यांची श्रीमंती, त्यांचे चंगळवादी जीवन यांचा 'मागास', 'विकसनशील' देशांमधील सधनांनाही हेवा वाटावा. पण हे श्रीमंत समाज स्वस्थ, समाधानी व सुखी आहेत का? चैन, विलास, उपभोग यांची हाव संपतच नाही, आणखी आणखी भोग हवेतच अशी ज्यांची मन:स्थिती असते ती माणसे व ते समाज स्वत:च्या जगण्यात एका पोकळीचा अनुभव घेत असतात. एखाद्या माणसाला खा-खा सुटली तर आपण म्हणतोच ना, की त्याचे ताळतंत्र बिघडले आहे!

दुसरीकडे, धार्मिक-आध्यात्मिक प्रवचने देणाऱ्यांना, उपदेश करणाऱ्यांना, सुख-समाधान व शांती प्राप्त करण्याच्या चार युक्त्या सांगणाऱ्यांना फार मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. तोही शिकल्या-सवरलेल्या उच्चभ्रू वर्गामध्ये. हे पण एका पोकळीतले चाचपडणेच आहे असे बेडेकर म्हणाले असते.

भारतामध्ये अलीकडच्या काळात देवदेवतांच्या जत्रांना होणाऱ्या गर्दीत अमाप वाढ होत चालली आहे. देवळांपुढल्या नवससायास करणाऱ्या भाविकांच्या रांगा लांब लांब होत चालल्या आहेत. यातुनिर्भर धर्मसंस्थेचे, विवेक व विज्ञान दोहोंनाही छेद देणाऱ्या छंदेवाईक धर्मश्रद्धेचे प्रस्थ माजतानाही अनुभवाला येत आहे. येथेही बेडेकर म्हणाले असते की, जीवनातील अर्थशून्यता, संभ्रम, दिशाहीनता भरून काढण्याचा, माणसाचे पाऊल मागे खेचण्याचा हा प्रकार आहे.

बेडेकरांना काय घडावयास हवे होते ते, ते स्पष्ट शब्दात मांडतात : ''श्रद्धेचा पुनर्लाभ व्हावा असे मी मानतो. पण यातुनिर्भर धर्मश्रद्धा पुन्हा लाभावी असे मला म्हणावयाचे नाही. तसेच, एकेश्वरी धर्मश्रद्धेचा पुनर्लाभ व्हावा असेही मला वाटत नाही. श्रद्धेच्या पुनर्लाभाला अस्तानंतरचा धर्माचा पुनर्लाभ' असे म्हणता येईल का?'' (पृ. ४१). आधुनिकता आणि विज्ञान यांच्या युगातील माणसाला श्रद्धेचा, धर्माचा पुनर्लाभ व्हावा ही बेडेकरांना इष्ट व आवश्यक गोष्ट वाटते, हे स्पष्ट आहे.

सकृत्‌दर्शनी ही गोष्ट मार्क्सवादी व नास्तिक असलेल्या बेडेकरांच्या बाबतीत विपरीत वाटावी अशीच आहे. बेडेकरांसारखी तत्त्वचिंतक व्यक्ती, मानवमात्राच्या आणि मानवजातीच्या कल्याणाची अहर्निश चिंता बाळगणारी व्यक्ती धर्मश्रद्धेच्या पुनर्लाभाची गोष्ट करते या गोष्टीचे विशेष महत्त्व आहे.

धर्म हा मनोव्यापार नित्यानुभवांना उल्लंघून जाणारा आहे. त्याची निर्मिती माणसाने प्राचीनतम काळी केली. या निर्मितीचा संबंध बेडेकर माणसाचे अज्ञान, त्याचे दुबळेपण व भय यांच्याशी सर्वस्वी जोडत नाहीत, हे आपण पाहिले आहे. यातुनिर्भर धर्मश्रद्धेचा उगमदेखील श्रेयस्कर समाजव्यूहाच्या निर्मिती-पुनर्निर्मितीच्या गरजेच्या पूर्तीसाठी झाला. ते म्हणतात, "ह्या (श्रेयस्कर समाजव्यूहाच्या) संकल्पनेमध्ये व्यक्ती आणि समूहच नव्हे तर मानवेतर प्राणिजात, वनस्पती आणि अचेतन वस्तुजातही सामावले गेले... यज्ञचक्र हे विश्वाचे प्रतीक झाले." (पृ.४१). ते पुढे म्हणतात, "अशा विश्वसमावेशक श्रद्धेला धर्मश्रद्धा असे परंपरेने आपण म्हणतो... धर्मश्रद्धा ही विश्वसमावेशक होती आणि आजवर ज्यांना आपण धर्म, धर्मपंथ, धार्मिक भावना व आचार म्हणून ओळखत आलो, त्यांना विश्वसमावेशक श्रद्धेची बैठक होती असे आपल्याला आढळून येईल. जगातील जुन्या-नव्या सर्व धर्मांना हाच न्याय लागतो, असे दिसेल." (पृ. ४१). तात्पर्य असे की, इहलौकिक जीवनाशी निगडित, अनिवार्य अशा ज्या मानवी गरजांच्या पूर्तीसाठी निःसंदेह श्रद्धेच्या अधिष्ठानावर धर्म या गोष्टीची निर्मिती झाली त्या, व्यक्ती व समष्टी या दोन्ही पातळ्यांवरील, गरजांची पूर्तता विज्ञान करू शकत नाही. बेडेकर म्हणतात, "कोणी म्हणेल की विज्ञानात रममाण होणे ही माझी धर्मश्रद्धा आहे. कोणी म्हणेल की देशभक्ती ही माझी धर्मश्रद्धा आहे... पण हे विधान आक्षेपार्ह आहे... हव्या त्या निष्ठेला धर्मश्रद्धा म्हणणे चूक ठरेल." (पृ.४१).

कार्ल मार्क्सला अनुसरणारे, अद्यापही आपण मार्क्सवादी आहोत असे आवर्जून म्हणणारे, प्रबोधनयुगाचे व विज्ञानयुगाचे वारसदार असलेले बेडेकर धर्म व श्रद्धा या दोन्ही गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत; त्या घातक, प्रतिगामी परिणाम घडविणाऱ्या आहेत, असे म्हणत नाहीतच. ते धर्मप्राय श्रद्धेच्या पुनर्लाभाच्या आवश्यकतेची गोष्ट करतात, असे का?

जगभर जे विशिष्ट धर्म त्यांचे त्यांचे सिद्धान्त, रूढी, कर्मकांड, पूजाअर्चा यांसह लोकांच्या पालनात आहेत त्यांपैकी कोणत्याही धर्माचा पक्ष बेडेकर घेत नाहीत; तसेच ते ठामपणे नास्तिक राहून धर्मश्रद्धेच्या पुनर्लाभाची गोष्ट करतात, या दोन्ही गोष्टी ध्यानात ठेवावयास हव्यात. परंतु ते धर्म आणि श्रद्धा या दोन शब्दांचा बुद्ध्या वापर करतात हेही ध्यानात ठेवले पाहिजे.

बेडेकर येथे जे म्हणत आहेत ते, अगदी गाभ्याशी जाऊन पाहिल्यास, माणसाच्या वैशिष्ट्यपूर्ण प्राणिरूपाशी संबद्ध आहे. अन्य कोणाही प्राण्याला प्राप्त नाही अशी अलौकिक सामर्थ्यसंपन्न बुद्धी व मन यांची देणगी त्याला लाभलेली आहे. आत्मभान असलेला, आत्मभान असल्याचा प्रत्यय बाळगणारा जाणीवसंपन्न असा हा प्राणी आहे. मानवी मन व बुद्धी यांचा पूर्ण थांग माणसाला अद्याप लागलेला नाही. माणूस हा कर्ता व निर्माता आहे. त्याला पूर्णत्वाची, विश्वाशी एकत्व अनुभवण्याची, विश्व जाणून घेण्याची उपजतच ओढ आहे. बेडेकरांनी म्हटले आहे, ''माणसाला स्वत:च्या असण्याचे भान असते आणि इतर माणसांच्या आणि वस्तूंच्या अस्तित्वाचीही जाणीव असते. ह्या भानाला आणि जाणिवेला काही आकार येतात का? येतात असेच म्हणावे लागेल. इतर प्राण्यांना भान असते, पण जाणिवेला आकार घेता येणे यात माणसाच्या मनाचे सामर्थ्य दिसते. या सामर्थ्याचे प्रत्यंतर मानवी मनाने निर्माण केलेला धर्म, विज्ञान, तत्त्वज्ञान, कला आणि समाजजीवन यांत आपल्याला दिसून येते.'' (पृ.१).

माणसाच्या ठायी स्वत:च्या सान्ततेचे, इतरांपासूनच्या वेगळेपणाचे, अपूर्णत्वाचे, स्खलनशीलतेचे भान असते. त्याच वेळी यांना उल्लंघून जाऊन त्याला अनंतत्वाची, अमरतेची, पूर्णत्वाची, विशुद्धतेची, पवित्रतेची ओढ पण असते. हे भान आणि आणि ही ओढ या दोन्ही गोष्टी त्याच्या माणूस असण्याचा, माणूसपणाचा भाग आहेत. माणूसपणाशी अंगभूतपणे निगडित आणखी एक गोष्ट म्हणजे त्याला त्याचे माणूसपण तो मानवांच्या समुदयात लहानाचा मोठा होण्याच्या ओघातच प्राप्त होते.

माणसाचे आत्मभान, त्याची जाणीव यांचे एक वैशिष्ट्य येथे महत्त्वाचे ठरते. त्याचे 'स्व' व 'पर' यांची ही जी ताटातूट माणूस अनुभवतो ती ताटातूट उल्लंघून एकरूप होण्याची (म. फुल्यांचा शब्द वापरावयाचा तर एकमय होण्याची) आसही माणसाला असते. बेडेकर म्हणतात, ''पुरुषमेधाच्या संकल्पनेप्रमाणे बळी जाणाऱ्या मानवाच्या देहमनातून सारे विश्व निर्माण झाले होते, आणि मानवी इच्छा, आकांक्षा व क्रिया यांच्याशी ते यातुशक्तीने एकरूप झालेले विश्व आहे. ही एकरूपतेची संकल्पना विज्ञानाने नाहीशी केली आहे. विराट आणि अंशत: उमगलेल्या विश्वात एका क्षुद्र ग्रहावर कोट्यवधी वर्षांच्या प्राणिविकासक्रमात जन्माला आलेली एक प्राणिकोटी हे (वैज्ञानिक परिप्रेक्ष्यात) मानवाचे विश्वातील स्थान आहे.'' (पृ.४३). माणूस स्वस्थ, निरामय, अभंग व शांत राहण्यासाठी 'स्व' व 'पर' यांच्यातल्या

अटळ अशा ताटातुटीला लांघणारी एकमयता व्यक्ती व समष्टी या दोन्ही पातळ्यांवर आवश्यक आहे, हे बेडेकरांचे म्हणणे मला खरे तर फार मार्मिक वाटते. विज्ञानाच्या परिप्रेक्ष्यात, विश्वाच्या निर्हेतुक पसाऱ्यात माणूस हा आत्मभान व जाणीव या पातळीवर उपरा ठरतो. त्याचे अस्तित्व, जीवनकार्य सारेच शेवटी अर्थशून्य व असंबद्ध (absurd) ठरते.

आत्मभान व जाणीवसंपन्न माणूस या स्वरूपात मानवाचा या पृथ्वीवर अवतार झाला त्या क्षणापासून आणि नंतर थेट आजपावेतो, माणसाला जे अनेक कूट प्रश्न पडत आले आहेत ते काही या विवेचनाच्या आरंभी येऊन गेले आहेतच. विश्वात्मकतेची ओढच त्यामधून अभिव्यक्त होते.

आधुनिक विज्ञानाच्या विकासाबरोबर विज्ञानवादी भूमिकेचा पण उत्कर्ष झाला. त्याचा पगडा आज आपणास सर्व क्षेत्रांमध्ये आढळतो. माणसाच्या ठायी पूर्णत्वाची, अमरत्वाची, विश्वाशी एकरूप होण्याची जी अंगभूत ओढ आहे तिची वैधताच विज्ञानवाद नाकारतो. आधुनिक विज्ञानाच्या चौकटीत व ज्ञानसंपादनाच्या प्रमाण एकमेव वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून ज्या गोष्टी सिद्ध करता येत नाहीत त्या अवैज्ञानिक व भ्रामक होत असे विज्ञानवादी भूमिका घोषित करते. मानवी जीवनामधून अशा सर्व गोष्टींना हद्दपार व निर्मूल केले जावे असा आग्रह धरते. आता, आधुनिक विज्ञानाच्या उदयापूर्वी प्रचलित असलेल्या अनेकानेक समजुती आज भ्रामक व खोट्या ठरल्या आहेत ही गोष्ट खरीच. उदारणार्थ, सूर्य रोज सकाळी पूर्वेकडे 'उगवतो' व पश्चिमेला 'मावळतो' हे माणसे पाहत आली होती. पृथ्वी ही एकाच जागी स्थिर आहे ही गोष्ट ती अनुभवीत होती. ऐंद्रिय संवेदनांच्या पुराव्याच्या आधारे मग सूर्याच्या उदयास्तावरून सूर्याच्या 'भ्रमणा'चे अर्थ लावले जात होते व सिद्धान्तन केले जात होते. आधुनिक विज्ञानाच्या उदयानंतर वैज्ञानिक ज्ञान प्राप्त झाल्यावर जुन्या समजुती भ्रामक, अडाणीपणाच्या होत्या हे आज सर्वमान्य झाले आहे. पण येथे एक गोची आहे. भौतिक विश्वातल्या (Physical universe) स्वतःचे मन (mind), 'इच्छा'/संकल्प शक्ती (will) नसलेल्या पदार्थांच्या (objects) संदर्भातल्या घडामोडींचे विशिष्ट प्रकारचे ज्ञान वैज्ञानिक अभ्यास पद्धतींच्या आधारे चोख होते खरे; पण जेथे 'मन'शक्ती गुंतलेली असते तेथे अनेक विषय व प्रश्न विज्ञानाच्या कक्षेत येत नाहीत व येऊ शकत नाहीत.

माणसाचेही अनेक व्यवहार यंत्रवत् (involuntary, mechanical) स्वरूपात होतात. ते वेगळे काढून वैज्ञानिक रीतींचा वापर करून त्यांचा अभ्यास होऊ शकतो, व तसा तो आज होतही आहे. आणि अशा प्रकाच्या व्यवहारासंबंधीही चोख वैज्ञानिक ज्ञान हाती येत आहे. पण ज्या व्यवहारांमध्ये—एरवी अगदी

यंत्रवत् चालणाऱ्या व्यवहारांच्या संदर्भात—मनाची गुंतवणूक होते तेथे वैज्ञानिक रीती पुऱ्या पडत नाहीतच. पण ते अभ्यासाचे, ज्ञानाचे विषय मात्र असतात. हे विषय इहलौकिक जीवनाचेच विषय असतात. माणसाचे आत्मभान व जाणीव यांच्याशी निगडित असे ते विषय असतात.

या संदर्भात बेडेकरांचे पुढील म्हणणे फार महत्त्वाचे आहे : ''वैज्ञानिक पद्धतीला ज्ञानप्रक्रियेचे परिणत स्वरूप मानून इतर पद्धतींना गौण व भ्रामक मानण्यात दुराग्रह असा आहे की, मानवी ज्ञानप्रक्रियेला एकसुरी, एका चाकोरीत जाणारी मानावी लागते. त्यामुळे दिव्यकथा (Myth), धर्मकल्पना (Religion), निर्द्वंद्वानुभूती (Mysticism), तत्त्वचिंतन व सत्ताशास्त्रीय चिंतन (Philosophical-Metaphysical Speculation), तार्किक आणि निसर्ग-वैज्ञानिक संशोधन (Positive Knowledge) आणि तंत्रविज्ञान (Technology) अशा भिन्न मार्गांनी मानवाची ज्ञानप्रक्रिया समृद्ध होत गेली आहे, या वस्तुस्थितीचे भान राहत नाही.'' (पृ. ६).

माणसाचे आत्मभान व त्याची जाणीव, चराचर सृष्टीशी अर्थपूर्ण नाते जोडण्याची त्याची अंगभूत प्रवृत्ती, पूर्णत्वाची व अमरत्वाची माणूसपणातच अंतर्भूत असलेली ओढ, इहलोकीच्या जीवनाच्या सार्थकतेची आस, त्याची सौंदर्यदृष्टी व त्याचा अंगभूत नीतिविवेक यांचा आणि धर्म या गोष्टीचा अविच्छेद्य संबंध आहे. बेडेकर प्रबोधनयुगाचे, विज्ञानयुगाचे वारसदार असल्याने 'धर्म' हा अखेरीस मनोव्यापारांचाच एक वैशिष्ट्यपूर्ण आकार आहे असे म्हणतात. विश्वाच्या बाहेर असलेल्या कोण्या ईश्वरनामक व्यक्तीने वा शक्तीने एकमेव सत्य व सनातन धर्म 'प्रकट' (reveal) केलेला नाही असे ते पूर्ण खात्रीने म्हणतात. त्याच वेळी विज्ञान-तंत्रविज्ञानाची कितीही अद्भुत व सर्वंकष वाढ झाली तरी माणसाच्या माणूसपणाच्या, त्याच्या इहलोकीच्या वैयक्तिक व सामुदायिक जीवनाच्या धारणेला व सार्थकतेला आधारभूत म्हणून 'धर्म' या आकाराचा मनोव्यापार (व व्यवहार) आवश्यक राहीलच राहील, असे बेडेकरांचे म्हणणे आहे. माणूस व त्याचे जीवन यांविषयीचे एक सनातन ('आर्य') सत्य ते प्रकट करीत आहेत असे मला आपल्याला नम्रपणे सांगावयाचे आहे. आणि 'धर्म' हा शब्द ते राखतात ही गोष्टही मला योग्य वाटते.

त्यांच्या विवेचनाच्या आरंभी बेडेकरांनी म्हटले आहे, ''धर्म म्हणजे अमुक एक धर्मपंथ अभिप्रेत नाही. धर्म ही केवळ संकल्पनाच अभिप्रेत नाही, तर धर्म मानणे व आचरणे अभिप्रेत आहे. धार्मिकता अनुभवणारी व धार्मिकतेने आचरण करणारी माणसे एका **उल्लंघित श्रद्धेने** जीवनाचा व विश्वाचा अनुभव घेतात व आचरण करतात, हे आपल्याला दिसेल.'' (पृ.२). म्हणूनच बेडेकरांनी धर्माबरोबर श्रद्धेच्या पुनर्लाभाची गोष्ट केली. हे त्यांचे म्हणणेही मला योग्य वाटते.

## ५

बेडेकरांनी वापरलेल्या ‘उल्लंघित सर्वंकष श्रद्धा’ या शब्दांचा एका वेगळ्या अंगाने मागोवा घेऊया. विज्ञानाच्या अंगाने पाहिले तर माणसाचा अवतार ही एक घडामोड आहे. माणसाला जन्म देऊन निसर्गसृष्टीला एखादे साध्य गाठायचे आहे का, या प्रश्नाचे उत्तर विज्ञानाच्या चौकटीत मिळत नाही, मिळू शकत नाही. ज्या आत्मभानाची व जाणिवेची गोष्ट बेडेकरांनी केली आहे, त्यांचीही ‘देणगी’ माणसाला अमुक एक गोष्ट वा स्थिती साधण्यासाठी दिली आहे, असे विज्ञान सांगत नाही. सांगू शकत नाही.

आत्मभान आणि जाणीव ज्या क्षणी उत्पन्न झाली त्या क्षणी माणसाच्या मनात प्रश्नांचे काहूर माजायला सुरुवात झाली असा तर्क करता येतो. आणि प्रश्न पडणे ही गोष्ट न संपणारी आहे. यांच्यापैकी अनेक प्रश्न असे आहेत की ज्यांना वैज्ञानिक ज्ञानात्मक उत्तरे मिळू शकत नाहीत. हा विश्वाचा पसारा कोणी व का निर्माण केला, हा असाच एक प्रश्न आहे. ‘काळाच्या ओघा’त तो कधी निर्माण झाला, तो ‘उत्क्रांत’ कसकसा होत गेला, हे वैज्ञानिक प्रश्न आहेत, आणि त्यांची उत्तरे आपण देऊ पाहतही आहोत. कोणी व का विश्व निर्माण केले, यांसारख्या प्रश्नांची उत्तरे आपण देऊ शकत नाही, ही आपली मर्यादा माणसाच्या लक्षात येते. पण विश्वाची निर्मिती हा केवळ निरर्थक, निर्हेतुक अपघात आहे हे त्याच्या तर्कबुद्धीला पटत नाही.

काही प्रश्न उत्तरांशिवाय राहिले तरी काही बिघडत नाही. पण जगण्याचे श्रेय कशात आहे; जगणे सार्थकी लागण्यासाठी कसे जगले पाहिजे, माणसांनी इतरांशी—यात माणसांबरोबर प्राणी, वृक्षवेलीही आल्या—कसे वागावे अशा साऱ्या प्रश्नांची उत्तरे तर द्यायला हवीतच. आता, काही प्रश्न व्यावहारिक असतात आणि साध्य डोळ्यांसमोर ठेवून अनुभव, निरीक्षण व तर्क यांच्या साहाय्याने उत्तर देता येते. श्रेय, मूल्ये, नीतितत्त्वे अशा काही गोष्टी माणूस केवळ यांच्या आधारे निवडू शकत नाही. निवड करण्यासाठीही सुरुवातीला काही आदि गृहीततत्त्वे (Axioms) स्वीकारलेली असावी लागतात, हे आपण पाहिले.

पण आदि गृहीततत्त्वे सर्वांसाठी तीच एक प्रमाण आहेत, तीच सनातन आर्यसत्ये आहेत हे मानवी तर्काच्या आधारे ठरू शकत नाही. एकच माणूस आयुष्यभरातच नाही तर, एका दिवसातही अनेक विभिन्न, परस्परविरोधी उत्तरे देतो, देऊ शकतो, आणि त्या त्या वेळच्या परिस्थितीच्या संदर्भात त्यांचे बौद्धिक समर्थनही करू शकतो. हा माणसाचा पूर्वापार अनुभव असणार. स्वत:मध्ये

माणसाने डोकावून पाहिले तर भावना, कामना, वासना-विकार यांच्या परस्पर विसंवादी, विरोधी ओढाताणीखाली त्याची अवस्था 'अव्यवस्थित' असते. जगाविषयीही असाच अनुभव माणसाला एका दृश्य पातळीवर सतत येतो.

जग जर अव्यवस्थित असेल, सावळा गोंधळच असेल आणि कशालाच अर्थ नसेल, गोष्टी हेतुगर्भ नसतील, श्रेय नावाची काही गोष्ट नसेल, तर? हा प्रश्न अतिशय बुद्धिमान, संवेदनशील व्यक्तींना प्राचीनतम काळीही पडला होता का? तितक्या प्राचीन काळचे ज्ञान आपल्याला नाही. पण जितके आदिम काळ व स्थिती यांच्यापर्यंत आपण प्रतिभानाच्या (intution) आधारे जाऊ शकतो तितके गेल्यावर त्या त्या समूहातील/समाजातील व्यक्ती नि:शंकपणे, सर्वंकष श्रद्धेने काही गोष्टींचे सत्यत्व, नैतिकपण स्वीकारून जगताना 'आढळतात'. आपण मर्यादित व सान्त आहोत; पण पलीकडे अतीत असे एक परतत्त्व/शक्ती आहे; हे परतत्त्व अमर्याद, अनंत व सर्वशक्तिमान आहे, या परतत्त्वाने साऱ्या सृष्टीची तसेच मानवी जीवनाची व्यवस्था लावून दिलेली आहे, या व्यवस्थेला आधारभूत मूल्ये, नियम, रीतीभाती आहेत, त्यांच्या आधारे योग्य-अयोग्य, सत्य-असत्य, शुभ-अशुभं यांमध्ये विवेक व निवाडा झालेला आहे, अशी ही धारणा असते. भय, अज्ञान, दुबळेपणा यांम:धून माणूस ही धारणा जन्माला घालतो, असे म्हणणे न्यायाला धरून नाही. त्याचा अनुभव, त्याचे ज्ञान, त्याची तर्कशक्ती, बुद्धी यांचा टोकाला जाऊन आदिम मानवानेही वापर केलाच असणार. तो केल्यानंतर (वा तो केल्यामुळेच) बेडेकरांच्या भाषेतील 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धा' त्याला लाभली व त्या श्रद्धेच्या पायावर 'धर्मा'चे प्राग्रूप त्याने सिद्ध केले.

आधुनिकपूर्व काळात जगणाऱ्या जगभरच्या मानवी संस्कृतीच्या आरंभिक टप्प्यांवरील वा अवस्थांमधील अनेकानेक जमातींचे मानवसंस्कृतिशास्त्रीय अभ्यास गेल्या दीड शतकात झाले आहेत. विश्व कोणी निर्माण केले, त्याची व्यवस्था कोणी लावली, अंतिमत: त्याचे नियंतेपण कोण करतो याविषयीच्या धारणा सर्व समाजांमध्ये एकसारख्या आढळत नाहीत. मात्र ही शक्ती/हे तत्त्व सचेतन असते, शक्तिमान असते आणि त्याची इच्छा डावलून माणूस काही घडवू शकत नाही, ही धारणा सर्वच 'धर्मा'च्या विभिन्न प्राग्रूपांच्या गाभ्याशी आढळते. मुद्दा असा की, आधुनिकता व विज्ञान यांच्या प्रबोधनयुगाचे संस्कार मुरविलेले आपण मात्र ठामपणे या सर्व मानवनिर्मित गोष्टी आहेत, असे म्हणतो. बेडेकरही त्यांना मानवी मनाने निर्मिलेले, आत्मभान व जाणीव यांना प्राप्त झालेले (वा त्यांना दिले गेलेले) आकारच मानतात. त्यांचे वेगळेपण असे की, उल्लंघित सर्वंकष श्रद्धेचा लाभ ते माणसाच्या व्यक्तिगत व सामूहिक अस्तित्वाशी अशा प्रकारे जोडतात की

या श्रद्धेचा लाभ झाल्यानेच माणूस वा माणूसपण लाभले.

मानवी व्यक्तीच्या नि समाजाच्या एकात्म धारणेसाठी तसेच विश्वाशी एकरूपता/एकत्व अनुभवण्यासाठीं 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धे'वर अधिष्ठित धर्माची निर्मिती माणसाने केली असे बेडेकरांचे म्हणणे येथे महत्त्वाचे ठरते. आजच्या विवेकवाद/विज्ञानवादाच्या जमान्यात बेडेकरांचे हे म्हणणे कळणेही अवघड जाणारे आहे. मात्र हे त्यांचे म्हणणे समजून घेणे आज अधिकच निकडीचे झाले आहे. मानवी समाज व संस्कृती यांच्या वाटचालीच्या त्यांच्या अभ्यासामधून त्यांच्या ध्यानात आले की व्यक्ती व समूह, दोहोंचीही एकता, एकात्मता इहलौकिक जीवनाच्या ओघात पुन:पुन्हा भंग पावते, विघटनवादी प्रवृत्ती वेगवेगळ्या कारणांनी उत्पन्न होत राहतात, आणि एकता, एकात्मता (unity आणि wholeness) पुन:पुन्हा निर्माण करावी लागते. मानवप्राण्याच्या स्वभावप्रवृत्तीतच या विघटनकारी प्रवृत्तींची बीजे आहेत.

नरमेधाच्या प्रथेने व विधीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. याची उकल करण्यासाठी त्यांनी कसून अभ्यास व चिंतन केले. या विषयावर त्यांनी अनेक निबंधही लिहिले. *तैत्तिरीय ब्राह्मण* ग्रंथातील एक मंत्र त्यांना या विषयाची उकल करण्याच्या संदर्भात फार मौलिक आढळला. त्यांचे या विषयावरील निबंध मुळातूनच वाचायला हवेत. त्यांनी असे म्हटले आहे की, "समूहाच्या शक्तीचे विकिर्णीकरण होऊन समूहाला क्षीणता आली असताना आपल्या प्राणाचे बलिदान करून बलिराजाने समूहाच्या समूहशक्तीचे (प्रजापतीचे) संभरण केले, असा या नरमेधाचा अर्थ लागतो." (पृ.११). पुढे ते म्हणतात, "या प्रथेमध्ये बळी जाणारा तरुण व तरुणी यांना राजा आणि राणी म्हणून सारे कुल प्रेमाने व शोकाकुलतेने हृदयाशी धरते. आणि या बलींच्या देहांतून व मनातून सारे कुल पुनर्जन्म पावले, असा प्रतीकात्मक साक्षात्कार त्या कुलाला होतो. या एकात्मतेचा विस्तार वाढून असाही साक्षात्कार कुलाला होतो की साऱ्या वस्तुजाताचा पूर्वजन्म या मेधातून (यज्ञविधीतून) झाला आहे. व्यक्ती आणि समूह यांच्या पूर्णत: प्रतीक अशा एकात्मतेचा परिघ मानवापुरता न राहता प्राणिसृष्टीला व अचेतन वस्तुजातालाही व्यापून टाकतो." (पृ.१५).

"मेध, यज्ञ किंवा बलिदानाचा विधी ही एक मानवी सामूहिक क्रिया आहे. पण ती शिकार, नांगरट, नृत्य, सहभोजन यांसारखी नित्यक्रमाची गद्य क्रिया नाही. या क्रियेत आरंभापासून शेवटापर्यंत एक मनोव्यापार आहे, तोही नित्याच्या पलीकडचा व्यापार आहे. तो प्रतीकात्मक आहे व सर्जनशील आहे." (पृ.१६).

बेडेकरांचे म्हणणे असे आहे की, मानवी व्यक्ती व समाज यांचे विकिर्णीकरण

पुन:पुन्हा होत राहणे ही अटळ अशी घडामोड आहे. संभरणाची, एकता-एकात्मता पुनरपि साध्य करण्याची गरज माणसाचे माणूसपण कायम राहील तोपर्यंत राहणारच आहे. त्यांचे पुढचे म्हणणे असेही आहे की, अशी एकता-एकात्मता साधून देणारी क्रिया ही उल्लंघित श्रद्धेच्या द्वारा घडून येऊ शकणारी प्रक्रियाच असू शकते. बेडेकरांच्या मते हा सर्व मानवी मनोव्यापारच राहतो, ज्याचे स्रोत मानवी आत्मभान व जाणीव यातच असतात.

येथे एक मोठी अडचण उपस्थित होते. आजवरच्या धर्मश्रद्धांच्या गाभ्याशी विश्वनिर्मात्या व विश्वचालक अशा 'परतत्त्वा'चे अस्तित्व व त्याचे नियंतेपणे श्रद्धापूर्वक सत्य म्हणून स्वीकारलेले आढळते. समाजागणिक, धर्माच्या विशिष्ट रूपागणिक चौकटी, परिभाषा वेगळ्या आढळतात पण मुख्य गोष्ट सामाईक असल्याचे म्हणता येते. नास्तिक बेडेकर आत्मा-परमात्मा, ईश्वर, परतत्त्व, सर्वांचा एकच आकाशस्थ पिता वा अल्लाह—या व अशा सर्व गोष्टी केवळ कपोलकल्पित, भ्रामक होत असेच म्हणतात. म्हणूनच ते एकेश्वर धर्मही नाकारतात.

मग प्रश्न असा पडतो की, त्यांना अभिप्रेत असलेली उल्लंघित सर्वंकष श्रद्धा ती कोणती? बेडेकर म्हणतात, "आपल्या वृत्तींना उत्तेजित करणारे व सफल करणारे हे विश्व आहे ही श्रद्धा. या विश्वाशी नाते जोडून आपण जे 'मानुष' विश्व निर्माण करीत आहोत ते विश्व संवादी आहे, ही ग्वाही मानवाला मनोमन मिळाली पाहिजे. ती ग्वाही एकटे विज्ञान देऊ शकत नाही. एकटी कला देऊ शकत नाही. ती ग्वाही फक्त श्रद्धा देऊ शकते." (पृ.४५). बेडेकरांच्या या मांडणीत एक पोकळी राहून जाते, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. श्रद्धेचा आशयाकार ते स्पष्ट करू शकत नाहीत. ते असे म्हणतात की, "विज्ञानाच्या व कलेच्या अति दीर्घ परंपरेने निर्माण केलेल्या 'मानुष' विश्वाशी व्यक्तीने संपर्क साधला, हे विश्व आपलेसे केले, तरच त्या व्यक्तीला त्या श्रद्धेचा लाभ होऊ शकतो." (पृ.४६). पण श्रद्धेचा आशयाकार स्पष्ट होत नाही तो नाहीच.

मानवी समुदायात व नैसर्गिक पर्यावरणात व्यक्ती जगते व तिला माणूसपण प्राप्त होते. आत्मभान व जाणीवसंपन्न माणूस इतर व्यक्ती, निसर्गसृष्टी व विश्व यांच्याशी त्याचे सत्य-शिव-सुंदर नाते काय याचा कसून शोध घेतो; ती त्याची स्वभावप्रकृतीच आहे. या नात्याची आधारशीला पायांखाली असली म्हणजेच त्याचे जीवन अर्थपूर्ण बनते, कृतार्थ बनण्याची शक्यता निर्माण होते, कारण विश्वाची, जीवनाची व्यवस्था (order) प्रकट करणारे ते नाते असते. तार्किक, बौद्धिक, युक्तिवादांच्या आधारे या नात्याचे/व्यवस्थेचे नि:शंक आकलन होत नाही. कारण कोणताही बौद्धिक, तार्किक युक्तिवाद खोडून काढता येतो वा

नाकारता येतो. आपले नेहमीचे ऐंद्रिय अनुभव, निरीक्षणे, व्यवहार 'उल्लंघून' जाणारे, सर्व गोष्टींची एकसमयावच्छेदेकरून व्यवस्था लावणारे असे हे साक्षात्कारी दर्शन/प्रकटनाच्या स्वरूपाचे हे ज्ञान असते. आपण असेही पाहू शकतो की, एक 'दृष्टी' प्राप्त होण्याशी याचा संबंध पोचतो; गोष्टी वेगळ्याच 'दिसायला', उमजायला लागतात. 'दृष्टी'चा लाभ होण्याने सनातन वैश्विक नाते/व्यवस्था काय हे दिसते/कळते पण ती व्यवस्था, ते नाते मानवाने व्यक्तिश: वा सामूहिकरीत्या निर्माण केलेले नाही, ते त्याचे श्रेय नाही ही गोष्ट स्पष्ट असते. पण नाते/व्यवस्था हीच आहे याविषयी नि:शंक स्वीकार असतो. ही 'बोधी' होय. उल्लंघित, सर्वंकष श्रद्धा हा म्हणून तिचा आशयाकार असतो.

आधुनिक वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून, त्या चौकटीचे प्रमाण निकष लावून 'सत्यासत्यता' पारखता येईल असे हे ज्ञान नाही. या विश्वाशी चराचर सृष्टीशी, मानवांशी (स्वत:शीही) माझे नाते मी जसे पाहतो, समजतो, जोडतो तसे ते असते, असे म्हणणे शक्य आहे, कारण मानवप्राण्याला आत्मभान, त्याचे भान व अभिव्यक्तीची भाषा यांची देणगी आहे. व्यक्ती तितक्या स्वभावप्रकृती (व तेवढी मते) असू शकतात. पण हा चकवा आहे. वैज्ञानिक ज्ञान जसे व्यक्तिनिरपेक्ष, सर्वांसाठी तेच एक चोख ज्ञान असते, तशीच या बाबतीतही गोष्ट असणार. जे ज्ञान प्राप्त करावयाचे आहे त्याची जातकुळी वेगळी असल्याने ते प्राप्त करून घेण्याची पद्धतीही वेगळी असावी ही गोष्ट स्वाभाविक व योग्य आहे.

माणसाचा पृथ्वीवर अवतार झाला, मानवी समाज अस्तित्वात आहे त्या प्राचीनतम काळापासून माणसाला अनेक प्रश्न पडलेले आहेत. त्यांची काही मांडणी बेडेकरांनी केलेली आपण पाहिली आहे. मानवाचे अस्तित्व व जगणे हे एका अर्थपूर्ण व हेतुगर्भ विश्वात घडते, आणि म्हणून या विश्वातल्या प्रत्येकाला चराचराचे, जीवनाचे योग्य, स्वाभाविक असे लक्ष्य, श्रेयस आहे आणि तसेच ते मानवाचे पण आहे, ही धारणा माणसाच्या नैसर्गिक घडणीचाच भाग आहे. विश्वाचे स्वरूप व कार्य, मानवाचे विश्वातील स्थान व त्याचे चराचर सृष्टीतील अस्तित्वाचे प्रयोजन व साफल्य या विषयांतील माणसाच्या मनात उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचे उत्तर ज्यामधून मिळते ते ज्ञान व्यक्ती व समाज यांच्या धारणेसाठी पायाभूत असते.

विश्व जर व्यवस्थित असेल तर ती व्यवस्था ही मानवाची निर्मित नाही. या व्यवस्थेचेच एक वैशिष्ट्य तिची उत्क्रांतिक्षम गतिमानता हे आहे. जे असते/आहे. त्याचेच 'ज्ञान' माणसाला होते. आता, आदिम मानवसमाजांपासून आधुनिकपूर्व काळापर्यंत, विशेष क्षमता प्राप्त असलेल्या वा कठोर साधनेच्या द्वारा क्षमता प्राप्त

करून घेतलेल्या व्यक्तींनाच हे ज्ञान प्राप्त होते, आणि सर्वांनी श्रद्धेने त्याचा स्वीकार करावयाचा असतो अशी मान्यता राहिली आहे.

धर्मप्राय श्रद्धेच्या गाभ्याशी बेडेकरांच्या म्हणण्यानुसार 'व्यक्ती आणि समूह यांच्या एकात्मतेची जाणीव' आहे. चिंतनामधून आणि जगण्याच्या ओघात त्याला मानवी समुदाय, निसर्गसृष्टी व विश्व यांच्याशी त्याचे एकत्व प्रत्ययाला येते. एका अंगाने त्याचे सुटे, अलग 'मी'पण, द्वैत, द्वंद्व यांचा तो नित्य अनुभव घेतच असतो. पण एकत्वाचा प्रत्यय त्याला अधिक चिरंतन व सत्य म्हणून अनुभवाला येतो. मानवी श्रद्धेचा मूळ स्रोत, बेडेकरांच्या मते, हा आहे.

समूहांच्या, समाजांच्या, अखिल मानवजातीच्या एकात्मतेचे पुन:पुन्हा संभरण होत राहण्याला बेडेकरांच्या विचारव्यूहामध्ये अनन्य महत्त्व आहे, हे आपण पाहिले. ते म्हणतात, "...साऱ्या मानवजातीची समूहता, एकात्मता, जर साध्य होणार असेल तर ती एका नव्या श्रद्धेच्या साक्षीनेच होऊ शकेल. ती श्रद्धा सर्वांची होईल तेव्हा साकार होऊ शकेल." (पृ.४७). ही नवी श्रद्धा हीच नव्या धर्माचे अधिष्ठान, आकार व आशय असेल, अशी भर मी घालू इच्छितो.

## ६

बेडेकरांच्या विवेचनात काही गंभीर त्रुटी राहून गेल्याचे दिसते. मार्क्सप्रमाणेच बेडेकरदेखील एका अंगाने युरोपियन प्रबोधनाचे (Enlightenment) अपत्य होते. शिवाय मार्क्सवादी होते. मानव हा एका अंगाने प्राणिकोटीत मोडत असला तरी, आत्मभानसंपन्न जाणिवेच्या आधारे त्याने, आंतरिक ओढीने, विश्वाशी नाते जोडून विश्वाला 'मानुष' बनविले आहे, ही गोष्ट खरी. पण विज्ञानवादी भूमिका, माणसासह विश्वातील सर्व गोष्टींना 'पदार्थ' (objects) म्हणून पाहण्यात भूषण मानते; या भूमिकेनुसार माणूस बाहेरून, निर्लिप्त कोरडेपणाने अभ्यास-संशोधन करून अ-मानुष वैज्ञानिक ज्ञान प्राप्त करतो व त्या ज्ञानाचे उपयोजन करतो. पण यामुळे विश्व 'मानुष' बनत नाही, तर ते ठामपणे अ-मानुष बनते, माणसापासून तुटते.

"यातुनिर्भरतेच्या कालखंडात मानुष-विश्व आणि विराट विश्व यांच्यात आंधळे एकरूपतेचे अद्वैत होते, त्यामुळे माणसाला आपली मर्यादाच कळली नव्हती" (पृ.४८) या बेडेकरांच्या वाक्याचे सखेद आश्चर्य वाटते. विश्वाविषयीचे वैज्ञानिक ज्ञान आधुनिकपूर्व काळी फार मर्यादित होते, पण त्या काळी विश्व जास्त 'मानुष' होते; आणि स्वत:च्या मर्यादेचे भान हाच तर एक ना एक स्वरूपाच्या ईश्वरशरणतेचा पाया होता.

माणसाने माणसांशी, चराचरांशी, स्वत:शीदेखील कसे वागावे, जगण्याची

सार्थकता व श्रेय कशात असल्याचे जाणावे, स्वत:चे माणूसपण कसे समजावून घ्यावे या बाबींमध्ये विज्ञान, कला, तत्त्वज्ञान, अर्थ व राज्यव्यवस्था इत्यादी वृत्तीप्रवृत्ती (activities) स्वत: होऊन काही तत्त्वे, मूल्ये सांगू शकत नाहीत. यांचा उगमस्रोत धर्मश्रद्धा यामध्येच असू शकतो हे बेडेकर कसे विसरले? किंबहुना, व्यक्ती आणि समष्टी—आणि समष्टीमध्ये त्याचे सजीव पर्यावरण तसेच माणसाच्या जगण्याला आधारभूत असलेली सर्व वस्तुजातही आले—यांच्या एकत्वाच्या आंतरिक ज्ञानात्मक प्रत्ययावरूनच नीतिविवेक कार्यान्वित होऊ शकतो, ही गोष्ट बेडेकरांच्या ध्यानातून का व कशी निसटली?

आणखी एक त्रुटी बेडेकरांच्या विवेचनात राहून गेली. समुदायात वाढल्यामुळेच माणसाला माणूसपण प्राप्त होते. तरी व्यक्तीचे स्वायत्त अस्तित्व व जीवनही मिटवता न येणारे असे असते. व्यक्तीचा समष्टीत विलय करता येत नाही. पण समुदायाच्या एकात्म धारणेसाठी आणि विकिर्णीकरणावर मात करून पुन:पुन्हा एकात्मता प्रस्थापित करणाऱ्या संभरणासाठी जी तत्त्वे, श्रेष्ठ कल्पना, मूल्ये रीतीभाती, संस्था यांची गरज असते त्यांचे प्रामाण्य प्रस्थापित करणे, त्यांना सर्वांची स्वीकृती व निष्ठा प्राप्त करणे आवश्यक असते. (व्यक्ती व विशिष्ट स्थळकाळात अस्तित्वात असलेली समष्टी यांच्या निरपेक्ष) असे प्रामाण्य मान्य व स्वीकृत धर्मश्रद्धेच्या आधारेच कालपरवापर्यंत प्राप्त करून घेतले जाई. धर्मश्रद्धा बाद करणाऱ्या आजच्या आधुनिक व आधुनिकोत्तर काळात सर्व गोष्टी सापेक्ष ठरल्या आहेत. व्यक्तिवाद सर्वंकष प्रभावी बनला आहे. मानवी जीवनाची व्यवस्था लावण्यासाठी, जीवनाला आकार देणाऱ्या आधारभूत गोष्टींसाठी ''कोणताही बाहेरचा अतिमानुष आधार नाही'' (पृ.४८) हे बेडेकरांचे म्हणणे समजू शकते. पण स्थलकालनिरपेक्ष सार्विक प्रामाण्य उल्लंघित सर्वंकष अशी (धर्म) श्रद्धाच प्राप्त करून देऊ शकते, आणि म्हणूनही धर्म व श्रद्धा या दोन्ही गोष्टींना माणसाच्या व्यक्तिगत व सामूहिक जीवनामधून बाद करता येत नाही. विश्वात्मतेचा, एकत्वाचा प्रत्यय व हा प्रत्यय हेच अंतिम व सर्वोच्च सत्य म्हणून श्रद्धापूर्वक स्वीकारणे हीच सार्विक प्रामाण्याची आधारशीला असते, असू शकते.

बेडेकरांच्या विवेचनाचे महत्त्व केवळ 'ॲकॅडेमिक' नाही. आधुनिकता व विज्ञान यांचे विधायक वृत्तीने स्वागत बेडेकर करीत होते. या अर्थाने ते आधुनिक व विज्ञाननिष्ठ होते. जगाच्या इतिहासात नाना धर्मपंथांनी, धर्मपीठांनी किती दडपणूक, गांजणूक व शोषण केले आहे, हिंसाचाराला उत्तेजन दिले आहे, युद्धे घडवून

आणली आहेत याचे पूर्ण भान त्यांना होते. धर्म व श्रद्धा या दोन्ही पायाभूत गोष्टींना भ्रष्ट व सवंग उथळ रूप देऊन धर्मपीठे, पुरोहित व शास्त्री-पंडित यांचा किती व कसा मोठा वाटा राहिला आहे याचीही माहिती त्यांना होती. त्या त्या स्थळकाळातल्या सत्ताधारीवर्गाशी हातमिळवणी करून लोकांना गुंगीत ठेवण्यासाठी नि सत्ताधाऱ्यांचे हितसंबंध जोपासण्यासाठी व राखण्यासाठी धर्मधिकाऱ्यांनी, स्वत:चा फायदा करवून घेत, जगभर धर्मश्रद्धा व धर्मसंस्था राबवल्या याची त्यांना पूर्ण कल्पना होती. मात्र मानवी जीवनाच्या शुभंकर धारणेसाठी, मानवजातीच्या एकात्मतेसाठी धर्मश्रद्धेची पायाभूत आवश्यकता त्यांनी दृष्टिआड केली नाही, यामध्ये बेडेकरांची प्रगल्भ जाण मला दिसते.

जीवनाचे श्रेय, सार्थकता, शिवस्वरूप कशात आहे याचा कसून शोध घेण्याची बौद्धिक व आंतरिक तपस्या केल्यानंतर, भगवान बुद्धांच्या भाषेत म्हणावयाचे तर, बेडेकरांना त्या 'आर्य सत्या'चे साक्षात दर्शन झाले. त्यातले मध्यवर्ती रूप कोणते होते? तर, माणूस हा वरकरणी सुटा, अलग (discrete) आढळतो, भौतिक सुखदु:खांच्या चौकटीत स्वत:चा स्वार्थ जास्तीतजास्त साधण्याचा आटापिटा करीत राहणे हीच त्याची स्वभावप्रकृती दिसते, तो जी सर्व नाती जोडतो त्यांच्या बुडाशी स्वार्थ साधण्याचाच हेतू भासतो, पण हे सत्य नव्हे; चराचर सृष्टीशी त्याचे एकत्व आहे, व्यक्ती म्हणून आपले स्वतोमूल्य (intrinsic value) व स्वायत्तपण अबाधित राखत समूहाशी ऐक्य साधणे व ते पुन:पुन्हा निर्माण करणे व अनुभवणे यातूनच त्याला जीवनासाठी ऊर्जा मिळते; स्वास्थ्य, शांती, समाधान व निरामयता यांचा लाभ होतो, हेच केवळ सत्य होय. हे बेडेकरांचे दर्शन होते. हे दर्शन मार्क्सवादी वळणाचे, आशयाचे होते. बेडेकरांचे पुढचे म्हणणे मात्र पोथीनिष्ठ मार्क्सवादात न बसणारे होते. ते असे की, या सत्याचा स्वीकार नि:संदेह वृत्तीने, 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धे'च्या स्वरूपात करणे अगत्याचे आहे. कारण तसे केल्यानेच इहलौकिक जीवनात विकीर्णतेवर पुन:पुन्हा मात करून एकत्वाचे संभरण माणूस करू शकतो. ह्या 'आकारा'ला उद्देशून 'धर्म' हाच शब्द वापरणे योग्य, अनिर्वाय व उचित आहे ही त्यांची भूमिका होती.

कोणताही विशिष्ट धर्म वा धर्मपंथ यांचे पुनरुज्जीवन बेडेकरांना अभिप्रेत नव्हते. त्यांनी म्हटलेय, " 'धर्म' संज्ञेच्या बाबतीत व्यावहारिक बाजू माझ्या दृष्टीने अशी आहे. आज भारतीय आणि सुशिक्षित मराठी समाजही 'धर्म' या संज्ञेचा 'तात्त्विक' आशय पाहण्यास उत्सुक नाही व जिज्ञासेने पाहणारा नाही. 'धर्मश्रद्धा' म्हणजे पारंपरिक धर्मश्रद्धा असे समीकरण आज लोकमानसात दृढ आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक धर्मांच्या अस्तानंतर पुन्हा मानवी मनात उद्‌भूत होणाऱ्या

श्रद्धेला 'धर्मश्रद्धा' म्हणणे गोंधळात टाकणारे होईल. म्हणून जिच्या पुनर्लाभाचो आशा मी प्रकट करू इच्छितो त्या श्रद्धेला मी यापुढे 'धर्मप्राय श्रद्धा' असे कटाक्षाने म्हटले आहे.'' (पृ.४३).

## ७

प्राधान्याने, बेडेकरांच्या *धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार* या व्याख्यानमालेतील प्रतिपादनाचा आधार घेत व त्यांना अनुसरत 'धर्मश्रद्धा' हा विषय मी आपल्यापुढे येथवर मांडला. बेडेकर त्यांच्या व्याख्यानांमधून आधुनिक, प्रागतिक, सेक्युलर, उच्चशिक्षित समाजाशी संवाद करीत होते. आणि मीदेखील आपल्या रूपाने याच समाजाशी आज हा संवाद करीत आहे. 'धर्म' व 'श्रद्धा' या दोन शब्दांना न बिचकता, शांत व स्थिर चित्ताने व बुद्धीने तत्त्वचिंतन करण्याची आज अधिकच गरज आहे. कारण पारंपरिक धर्मश्रद्धांच्या, लोकांच्या ठायी खोलवर रुजलेल्या धार्मिक भाविकतेचा राजकारण-समाजकारणासाठी, धनसंचय करण्यासाठी आज कुशलतेने, बेरकीपणे केला जाणारा वापर वाढला आहे. धर्म व श्रद्धा यांचे उच्चाटन करण्याचा खटाटोप व्यर्थच नव्हे तर चुकीचा आहे, हे बेडेकरांचे सांगणे आपण सर्वांनी विनीतभावाने स्वीकारण्याची मोठी निकड आहे. धर्मचिकित्सा व्हायलाच हवी आहे; पण बेडेकरांच्या सहृदय वृत्तीने धर्म व श्रद्धा यांचा स्वीकार केल्यासच प्रभावीपणे व परिणामकारकरीत्या आपण ती करू शकणार आहोत, एरवी नाही.

'धर्मश्रद्धा विरुद्ध विवेक' (Faith Vs. Reason), 'विज्ञान विरुद्ध धर्म' (Science Vs. Religion) या प्रकारे हा सारा विषय युरोपात आधुनिक काळात हाताळला गेला याला तेथील विशिष्ट पार्श्वभूमी कारणीभूत होती. बेडेकरांनी आपल्याला दाखवून दिलेय की धर्म व विज्ञान हे मानवी मनोव्यापारांचे दोन आकार परस्परविरुद्ध नाहीत; परस्परपूरकता हा त्यांचा खरा संबंध आहे. हीच गोष्ट श्रद्धा व विवेक यांचीही आहे. खरी श्रद्धा विवेकाधिष्ठितच असते आणि ज्ञानसंपन्न असते.

धर्म व श्रद्धा, धर्मश्रद्धा या विषयावरच्या बेडेकरांच्या विवेचनाला जोड देणाऱ्या गोष्टी मी आपल्यासमोर आपल्या विचारासाठी ठेवणार आहे. आपणा सर्वांना ही परिचित गोष्ट आहे की, हिंदू समाजविचारात चार पुरुषार्थांची गोष्ट केलेली आहे, आणि धर्म त्यातला एक पुरुषार्थ आहे. अर्थ व काम या दोन पुरुषार्थांच्या आधारे माणूस भौतिक अर्थाने जगतो. पण माणूस एकेकटा, सुटा नसल्याने, तो समूहात राहत असल्याने भौतिक जीवनाचीही योग्य, उपकारक व्यवस्था लावावी लागते. माणसाने कसे जगणे-वागणे योग्य आहे, सदाचार कोणता, दुराचार कोणता, कर्तव्य काय असते व त्याचे पालन कसे करावे यांसारख्या मुद्द्यांना धरून

जीवनव्यवस्था उभी करणे व तिच्यानुसार सर्व जण वागतील असे पाहणे म्हणजे धर्म या पुरुषार्थाचे पालन करणे होय असे ढोबळमानाने म्हणता येईल. व्यक्ती व समाज यांची धारणा करणे, आणि सत्यनिष्ठ व सत्त्वशील जीवनाला अनुरूप अशी शिकवण पुरविणे हे धर्माचे प्रयोजन होय. महात्मा फुले त्यांच्या काळातल्या पारंपरिक हिंदू धर्माचे कट्टर विरोधक होते. त्यांनी त्यांच्या उत्तर आयुष्यात 'सार्वजनिक सत्यधर्मा'चे प्रवर्तन केले. धर्म ही संज्ञा त्यांनी वरील अर्थानेच वापरली.

आधुनिक राष्ट्र-राज्य संविधानावर अधिष्ठित असते. भारतीय संविधान हे भारतीय समाजाची धारणा करणारे धर्मपुस्तक—'स्मृती'—आहे असे म्हटले तर? एका मर्यादेपर्यंत हे म्हणणे उचितच आहे. व्यक्तिवादी भूमिका संविधानाला आधारभूत आहे, आणि व्यक्तिवाद सुरक्षित राखून समाजाचा सभासद म्हणून व्यक्तीने कसे व्यवहार करावेत, कोणती कर्तव्ये पार पाडावीत, पथ्ये पाळावीत व हक्कस्वातंत्र्ये उपभोगावीत याची स्पष्टता संविधान करते. पण धर्म ही वेगळी गोष्ट आहे. महात्मा फुल्यांचे अखंड वाचले तर मानवी जीवनाचे श्रेय कशात आहे हेसुद्धा ते 'सत्यधर्मा'ची शिकवण म्हणून सांगतात. हे ते का सांगू शकतात? कारण आपणा सर्वांचा एक 'निर्मिक' आहे, सर्व माणसे—स्त्री-पुरुष—त्याची लेकरे आहेत ही त्यांची विवेकयुक्त श्रद्धा आहे. आणि तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या निर्मिकाने प्रकट केलेला सत्यधर्म आपण जाणला आहे हा त्यांचा आत्मप्रत्यय आहे. जीवनार्थ जीवनाचे श्रेय—जीवनविषयक अंतिम सत्य—प्रकट करतो, सांगतो, शिकवतो हे धर्माचे व्यवच्छेदक लक्षण म्हणता येते. आणि हे सर्व मानवासाठी तेच एक असते; व्यक्तिवादी भूमिकेमधून ते हरएक व्यक्ती तिला हवे तसे ठरवू शकत नाही. आणि राज्यसत्ता संविधानाद्वारा प्रस्थापित करू शकते असेही ते नाही.

तत्कालीन ब्राह्मणी प्रभुत्वाखालील परंपरागत हिंदू धर्माची कठोर चिरफाड करणारी फुले यांची चिकित्सा बुद्धी व तर्क यांवर आधारलेली आहे. पण या भूमिकेच्या पलीकडे जाऊन, सश्रद्ध अंतःकरणाने ओतप्रोत महात्मा फुले सत्यधर्माचे प्रकटन करतात ही गोष्ट विशेष ध्यानात घेण्यासारखी आहे.

महात्मा फुले काय किंवा दि. के. बेडेकर काय हे एकमय मानव समाजाचे स्वप्न पाहत होते. श्रीमंत-गरीब, मालक-मजूर, सवर्ण-अवर्ण, हिंदू-मुस्लीम, स्त्री-पुरुष विषमता या प्रकारचे भेदाभेद मिटवून टाकले जावेत, बंधुभाव, परस्पर सहकार्य व प्रेम यांनी सर्व एकमेकांशी आत्मीय नात्याने जोडले जावेत, अशी त्यांची ध्येयदृष्टी होती. अशी एकमयता ऐक्याच्या आंतरिक पण दृढ प्रत्ययामधून निर्माण होऊ शकते. पण हा प्रत्यय येण्यासाठीदेखील समुदायाचे एकत्व निःसंदेहपणे

मनात ठसलेले असावे लागते; तेही अशा स्वरूपात की जे संभरणाच्या विधींद्वारे अभिव्यक्त केले जाते, पुन:पुन्हा दृढ केले जाते.

गेल्या पाचशे वर्षांच्या काळातल्या आर्थिक व राजकीय घडामोडींनी जग व्यावहारिकदृष्ट्या एक बनले आहे. आजचे जागतिकीकरण हा त्याचाच आविष्कार आहे. पण आजचे जागतिकीकरण हा पैशाचा, व्यक्तींचा विषम व्यवहार आहे. जग एकत्र आले आहे. पण एकमय होण्यापासून फार दूर आहे. संयुक्त राष्ट्र संघटना, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन, बहुराष्ट्रीय महाकाय कंपन्या, महासत्तांचे, साम्राज्यवादी प्रभुत्व यांसारख्या गोष्टींनी जग जबरीने एका आर्थिक-राजकीय व्यवस्थेत बांधून ठेवले जाऊ शकेल. पण अव्यवस्था झाकणारीच ती 'व्यवस्था' असते.

'मानव तितुका एकच आहे', माणसाच्या अस्तित्वाने व कार्याने अर्थपूर्ण बनलेले, वैशिष्ट्यपूर्ण आकार घेत आलेले हे मानुष विश्व आहे, माणसाचे चराचर सृष्टीशी सहोदरत्व/एकत्व आहे, व 'वसुधैव कुटुंबकम्' हेच सत्य, शिव व सुंदर नाते आहे, या आशयाची वैचारिक मांडणी जगात आज प्रतिष्ठा पावत आहे. तीच मानवजातीचा विनाश टाळू शकेल, अशी सर्वमान्यताही वाढत आहे. बेडेकरांच्या भाषेत 'उल्लंघित सर्वंकष श्रद्धा' (म्हणजेच धर्मप्राय श्रद्धा) हे रूप, हा धर्माचा आकार, मात्र या विचारव्यूहाला प्राप्त झालेला नाही. आणि त्यामुळे या विचारव्यूहामध्ये मानवजातीला एकमय करण्याची शक्ती उत्पन्न झालेली नाही. या विचारव्यूहाला आचारशक्ती प्राप्त होण्यासाठी त्याला धर्मप्राय श्रद्धेचे रूप प्राप्त व्हावे लागेल.

## ८

माझे मुख्य विवेचन येथे संपले. धर्म व श्रद्धा या संज्ञा जर ग्राह्य मानायच्या तर, 'अंधश्रद्धा' नावाच्या गोष्टी, आचार राहतात की नाही? जर अंधश्रद्धा असे काही असेल आणि त्या घातक असतील तर त्यांचे निर्मूलन करावयास हवेच ना? श्रद्धा आंधळ्या व घातक आहेत हे कसे ओळखावयाचे, ठरवावयाचे, या प्रश्नाकडे आता वळूया.

भारतासारख्या अनेकानेक—कदाचित काही हजारांमध्ये—जनजाती असलेल्या प्राचीन पण आजही जित्याजागत्या असलेल्या बृहद् समाजात अनेकानेक प्रथा, रीतिरिवाज, समजुती, आचार व कर्मकांड, सण-उत्सव-जत्रा, विधी, पूजा-अर्चेचे प्रकार या परंपरेने चालत आलेल्या गोष्टी असतात. काळाच्या ओघात त्यांपैकी अनेक बाद होतात, वा त्यांच्यात बदल होतो. भारतीय समाजाचा एक मोठा भाग आधुनिकपूर्व मानसिकतेत वावरणारा, जगणारा आहे. परंपरेने चालत आलेल्या

गोष्टींच्या चाकोरीत त्याचे बरेचसे जीवन व्यतीत होते. परंपरेचे प्रामाण्य मोठे असते. धर्माला धरून आपण वागतो आहोत अशी धारणा असते. श्रद्धेचे पाठबळ असते. धर्मश्रद्धा व परंपरा या स्वायत्त असतात. त्या लोकांच्या मनोमन धारणेवर व पाठिंब्यावर उभ्या असतात.

धर्मश्रद्धेची चिकित्सा करून धर्माचे, परंपरेचे परिष्करण ज्यांना करावयाचे आहे त्यांनी प्रथमत: जो समाज स्वायत्तपणे, कायद्याचे बंधन वा राज्यसत्तेची लादणूक नसताना, ज्या रूढी, प्रथा, विधी यांचे पालन दीर्घकाळ करीत आला आहे त्याचा इतिहास व त्यामागील मानस जाणून घेतले पाहिजे ही पहिली गरज आहे. त्यांपैकी कोणत्या श्रद्धांचा परिणाम समाजाच्या अहिताचा आहे, आणि त्यातल्या कोणत्या श्रद्धा त्यांचे पालन करणाऱ्यांच्या हिताच्या नाहीत, याविषयी धर्मश्रद्ध व्यक्ती व समूह यांच्याशी संवाद साधला पाहिजे. या संवादाचा भाग म्हणून गांधीजींच्या अर्थाने सत्याग्राही संघर्षही करावा लागेल; संघर्षही संवादाचेच प्रगल्भ रूप असेल याची खबरदारी घ्यावी लागेल. धर्मश्रद्धा या आधुनिक व विज्ञाननिष्ठ असण्याची शक्यता कमीच. पण केवळ म्हणून त्यांना अंधश्रद्धा, घातक श्रद्धा असे संबोधून त्यांना उच्चाटनाचे लक्ष्य करण्याची भूमिका अयोग्य होईल.

बेडेकरांनी त्यांच्या विवेचनाच्या आरंभीच नरमेधाच्या प्रथेची व विधीची आदरपूर्वक चर्चा केली आहे. नरमेध ही पुनरुज्जीवित करावी अशी प्रथा आहे, असे ते अजिबात म्हणत नाहीत. ती प्रथा एकेकाळी अनेक आदिम जमातींमध्ये का आढळत होती याचा शोध त्यांनी घेतला आणि त्यांच्या हाती एक महत्त्वपूर्ण तथ्य आले. या वृत्तीने ऐतिहासिक, समाजशास्त्रीय व मानवसंस्कृतिशास्त्रीय रुढी-प्रथा-विधी आदींची चिकित्सा त्यांचे पालन करणाऱ्यांविषयी सहृदयता वा आदरभाव बाळगून केली पाहिजे. याचे कारण असे की, ज्या श्रद्धा, रूढी वगैरे गोष्टी आपणास घातक, निर्मूल करण्यायोग्य वाटतात त्यांची पकड लोकमानस व व्यवहार यांच्यावर राहणार नाही यासाठी कोणते व्यापक परिवर्तन घडून यायला हवे त्याची उकल होण्यास मदत होईल.

आपण सतीप्रथेचे उदाहरण घेऊ. काही वर्षांपूर्वी राजस्थानमध्ये रूपकुंवर ही तरुणी सती गेली. त्या वेळी बऱ्याच काळानंतर या प्रथेसंबंधी पुष्कळ चर्चा झाली. ब्रिटिश राजवटीखाली लॉर्ड बेंटिक यांनी १८३० च्या आसपास कायद्याने सतीची चाल बंद पाडली. सुधारक, पुरोगामी, सेक्युलर, परिवर्तनवादी, आधुनिक शिक्षित, बुद्धिप्रामाण्यवादी मंडळींचे ठाम मत असे की जबरदस्तीनेच स्त्रीला सती जायला भाग पाडले जात असते; विशुद्ध पतिनिष्ठेपायी कोणी स्त्री जाळून घेईल हे कसे

शक्य आहे? कायदा करून सक्तीने सतीप्रथा बंद पाडल्याचे समर्थन केले जाते.

योगायोगाने सतीप्रथा हा काही जणांनी अभ्यासविषय बनविला असल्याने अशा पारंपरिक प्रथांच्या संदर्भातील गुंतागुंत पुढे आली आहे. ही प्रथा प्राचीन आहे आणि तिचे धागेदोरे भारताबाहेरही पोचतात. पण ही प्रथा राजघराण्यांपुरतीच वा 'क्षत्रियां'पुरती बव्हंशी मर्यादित होती, सर्वसामान्यांमध्ये तिचा प्रसार नव्हता असे दिसते. मध्ययुगात स्वत:ला राजपूत म्हणविणाऱ्या 'क्षत्रिय' राजघराण्यांमध्ये या प्रथेचे प्रचलन जास्त दिसते. दुसरी गोष्ट अशी दिसते की, किमान काही स्त्रिया तरी स्वेच्छा सती गेल्या असाव्यात; पूज्यभावाने अशा स्त्रियांचा गौरव त्यांच्या चारित्र्यामुळे व आदर्शवत जीवनामुळे होत आला असेही म्हणायला जागा आहे. सर्व सती स्त्रियांना हा गौरव प्राप्त झालेला दिसत नाही. एकोणिसाव्या शतकात रत्नागिरी जिल्ह्यात सतीची काही प्रकरणे घडत होती. ब्रिटिश सरकारने स्त्रीवर सक्ती होत असल्याचे आढळले तर प्रतिबंध करण्याचे व संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याचे अधिकार शासनयंत्रणेला दिले होते. त्या काळात एका प्रकरणी तरुण स्त्री स्वेच्छेने, शांतपणे, स्थिरचित्ताने सती गेल्याचे एक उदाहरण नोंदवले गेल्याचे एका संशोधक स्त्रीला आढळले. अशा स्त्रिया अपवादभूत राहिल्या असतील, पण वैज्ञानिक दृष्टी बाळगणाऱ्यांनी हा प्रश्न तर विचारला पाहिजेच की, यामागील मानस काय होते व ते कसे घडले म्हणावे? थोडक्यात, संस्कृती व परंपरा जाणून घेतल्या पाहिजेत. आशिष नंदी या प्रख्यात विचारवंतांनी अठराव्या-एकोणिसाव्या शतकात बंगाल इलाख्यात स्त्रियांना सर्रास सती देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडू लागल्या त्यांचा अभ्यास केला आहे. (राजा राममोहन रॉय यांच्या पुढाकारामधून लॉर्ड बेंटिक यांनी बंदीचा कायदा करण्याला ही पार्श्वभूमी होती.) समाजातील एका विशिष्ट वर्गाचे स्वार्थी-संकुचित भौतिक हितसंबंध बायकांवर सती जाण्याची सक्ती करण्यात कसे गुंतलेले होते याचे विवेचन त्यांनी केले आहे. देवरालाच्या रूपकुंवरच्या सती-घटनेवरही त्यांनी लिहिले आहे.

तात्पर्य असे की, कायद्याने सतीप्रथा निर्मूल केली गेली असली तरी त्या मागचे मानस अद्यापि बरेच प्रभावीपणे टिकून आहे, आणि त्यातल्या गुंतागुंतीसह ते जाणून घेण्याची गरज आहे, ते मानस निर्मूल करण्याचे उद्दिष्ट बाळगणाऱ्यांना याची जास्तच गरज आहे. प्रथा कायद्याने बंद पाडणे पुरेसे नाही.

साहजिकच असा प्रश्न विचारला जाईल की, अगदी एखादी स्त्री स्वेच्छा सती जाते आहे असे सिद्ध झाले तर तिला सती जाऊ द्यावयाचे का व तिच्या सती जाण्याचे समर्थन करावयाचे का; तिच्या मानुष-कर्तेपणाचा (Human Agency)

आदर करण्याचे कारण पुढे करून, या प्रथेला आज आपण कायद्याने अवकाश ठेवावयाचा का?

या प्रकारची तात्त्विक व व्यावहारिक समस्या महात्मा गांधींपुढे प्रत्यक्षात उपस्थित झाली होती ही गोष्ट बहुतेकांना माहीत नसेल. गांधीचे एक सत्‌शिष्य शेठ जमनालाल बजाज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी जानकीदेवी बजाज यांनी सती जाण्याचा स्वत:चा संकल्प जाहीर केला. त्यांच्यावर कोणी सक्ती करण्याचा प्रश्नच नव्हता; त्या फार करारी, जिद्दी बाण्याच्या स्वतंत्र स्त्री होत्या, आणि गांधींच्या प्रभावळीतल्या होत्या ही गोष्ट आपण ध्यानात ठेवली पाहिजे. त्यांच्या संकल्पाचा आदर करीत गांधींनी त्यांच्याशी संवाद केला. त्यांच्या टोकाच्या आत्मसमर्पणाच्या वृत्तीचे स्वागत करीत त्यांनी त्यांच्यासमोर सर्जनशील, विधायक पर्याय ठेवला. जमनालालांनी ज्या कार्यासाठी स्वत:ची शक्ती, बुद्धी, व धन समर्पित केले होते ते त्यांचे सेवाकार्य पूर्ण समर्पणवृत्तीने, अहंकारी 'स्व'चा लोप करून जानकीदेवींनी पुढे चालविण्याचा संकल्प करणे व उर्वरित आयुष्य त्यासाठी व्यतीत करणे, हे अधिक सार्थपणे सती जाणे होईल; हे 'सतीचे वाण' त्यांनी अंगीकारावे, असे त्यांनी जानकीदेवींना समजावून देऊन त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाला आवाहन केले. जानकीदेवींनी स्वत:च त्यांचा निर्णय बदलला.

एका जानकीदेवींचे मानस-परिवर्तन गांधी त्यांच्या प्रभावाने करू शकले, पण सर्वसामान्य स्त्रियांचे व व्यापक समाजपरिवर्तनाचे काय, हा प्रश्न उपस्थित होईल. आणि तो वास्तवातला खरा प्रश्न आहेच. तत्त्व आणि व्यवहार यात काही अंतर राहते, हे म्हणणे मला अमान्य नाही. सतीप्रथेला बंदी करणारा कायदा अस्तित्वात आहे, तो आज अधिक कडकही केला गेला आहे. त्याची अंमलबजावणी चोख व्हायला हवीच. पण हेही लक्षात घ्यायला हवे की, व्यवहारात रूपकुंवरच्या सतीची घटना घडली आणि (आशिष नंदी व इतरही काही अभ्यासकांनी म्हटलेय त्याप्रमाणे) सतीच्या घटना तुरळक पण मधून मधून अलीकडेही घडत आल्या आहेत. नंदींनी म्हटलेय की, तरुण विवाहित स्त्रियांची ठरवून, छळ करून, जाळून हत्या करण्याच्या घटना तर पुष्कळ मोठ्या संख्येने समाजात घडतच आहेत. जातीबाहेर लग्न करण्याचे ठरविल्याकारणाने तरुण मुलींचे व (अल्प प्रमाणात) युवकांचे खून होतात, वा दोघेजण मिळून आत्महत्या करतात, असे प्रकारही घडतात, हे आपण जाणतो. म्हणजे कायदा केल्याने वा राज्यसत्तेने औपचारिक पातळीवर रूढी, प्रथा यांचे पालन गुन्हा ठरविल्याने व्यवहारातही प्रश्न सुटत नाहीत.

तेव्हा, तात्त्विक व व्यावहारिक दोन्ही पातळ्यांवर, ज्या श्रद्धा, रूढी, प्रथा

इत्यादी आंधळ्या व घातक असण्याबद्दल आपली खात्री पटलेली आहे त्यांचे निर्मूलन करण्यासाठी कायदा व राज्यसत्तेचा बडगा यांवर पूर्णतया विसंबता येत नाही, हे प्रथमतः विनीतभावाने ओळखण्याची व स्वीकारण्याची गरज मला दिसते. विशेषतः ज्या गोष्टी समाजमानस व व्यवहार यांमध्ये सार्वत्रिक पातळीवर खोलवर रुजलेल्या, मुरलेल्या व दीर्घकाळ परंपरेने चालत आलेल्या असतात त्या गोष्टींच्या संदर्भात तर हे जास्तच खरे असल्याचे आपल्या अनुभवाला आले आहे.

गेल्या दोनशे वर्षांच्या काळात, ब्रिटिश राजवटीच्या काळात, आपला समाज अनेक अंगांनी पुष्कळ बदलला आहे. आजही सतत बदलतो आहे. आपला जातिबद्ध समाज म. फुल्यांच्या काळात कमालीचा कर्मठ होता. ब्राह्मणजातीयांचे कसब व कपट याला कारणीभूत होते, ही मीमांसा खरी नाही, ही गोष्ट आपण अनेक जातीजमातींचे मानस व व्यवहार पाहिल्यास ध्यानात येते. जे बदल परिणामकारक व टिकाऊ सिद्ध झाले आहेत ते कोणते व का, याच्या खोलात जर आपण गेलो तर आपल्याला असे आढळेल की, (१) आर्थिक-राजकीय घडी बदलली, तिच्यामुळे समाजातील चलनवलन अनेक अंगांनी वाढले, खूप मोडतोडही झाली; तशाच अनेकानेक नव्या संधी निर्माण झाल्या आणि त्या संधीचा लाभ उठवून अनेक समाजघटकांनी आपला अभ्युदय घडवून आणला वा परिस्थितीशी जुळवून घेतले. समाजमानस व व्यवहार यांमध्ये मोठे परिवर्तन घडून आले. (२) नव्या 'इंग्रजी शिक्षणा'चे, मिशनऱ्यांच्या घणाघाती टीकेमुळे, त्यांच्या सेवाकार्यामुळे, नव्या विचारांचा, मूल्यांचा, रीतीभातींचा, संस्थांचा, कार्यप्रणालींचा समाजजीवनात प्रवेश झाला, त्यांच्याकडे लोक आकृष्ट झाले; नवी दृष्टी प्राप्त झाली. (३) जुन्या रूढी-परंपरा, सामाजिक संस्था, शास्त्रे यांचे प्रामाण्य नष्ट झाले आणि त्यांची पकड ढिली पडली; यामध्ये इंग्रजी सत्ता येथे सर्वोच्च व सार्वभौम म्हणून प्रस्थापित होण्याचाही मोठा वाटा होता. (४) नव्या दृष्टीचा, ध्येयांचा, आकांक्षांचा, तत्त्वांचा अंगीकार ज्यांनी केला, ज्यांनी आपल्या धर्म, संस्कृती व परंपरा नव्याने जाणून घेत, त्यांची पुनर्मांडणी करीत नव्या अस्मितेचे जागरण घडवून आणले अशा अनेकानेक व्यक्तींनी व समूहांनी स्वतःच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणीत, समाजाचे प्रबोधन घडवीत परिवर्तनाची अनेक कार्ये स्वबळावर स्वायत्तपणे उभारली. चळवळी केल्या, लढे दिले. (राज्यसत्तेची या सगळ्यात एक फार गौण भूमिका राहिली. राज्यसत्तेचे हितसंबंध वेगळेच होते.). यामधून समाजमानस व व्यवहार सर्वात अधिक परिणामकाररीत्या बदलले व ते सर्वाधिक टिकाऊ ठरले.

लोकांची धार्मिकता, भाविकता मिटली नाही. लोक श्रद्धावान राहिले. पारंपरिकही राहिले. पण सतत बदलतही आले. अगदी जातपात आणि स्पृश्यास्पृश्यता

यांसारख्या गोष्टी घेतल्या, स्त्रियांची स्थिती जरी विचारत घेतली, धार्मिक आचार, कर्मकांड जरी घेतले तरी फार मोठे बदल कायमचे झाले आहेत. आपणाला ज्या गतीने व जे बदल व्हावेत असे वाटते तेवढ्या गतीने ते बदल झाले नाहीत ही गोष्ट राहते. पण असेही पहा की, स्वत:ला प्रबुद्ध व पुढारलेले म्हणविणाऱ्या अत्यल्पसंख्य मंडळींनी चुटकी वाजवावी, आदेश द्यावे आणि त्यांच्या म्हणण्यानुसार समाजाने तात्काळ बदलावे ही गोष्ट घडणे खरोखर इष्टही म्हणता येणार नाही. कारण या मंडळींच्यातही अनेक समजुती, प्रथा, त्यांचे अनेक निर्णय हे असमंजस, आंधळे, घातक शाबीत होत आले आहेत. भलेही ते विज्ञान, बुद्धिप्रामाण्यवाद, प्रगती यांच्या नावे प्रसृत केले जात असोत. पर्यावरणीय असमतोलाचे नि ऱ्हासाचे संकट साऱ्या जगावर ओढवले आहेच ना? प्रदीर्घ कालावधीमध्ये समाजाची स्वायत्त प्रक्रियेच्या आधारे धारणा होते, अस्मिता आकाराला येते. एकात्मता/एकत्व टिकून राहते याला कारणीभूत असणाऱ्या श्रद्धा, रीतीभाती, प्रथा, रूढी, परंपरा आदी यांची दृढमूलता आणि त्यांचे योगदानही आपण जाणून घेतले पाहिजे. या सगळ्या अडाणी, निर्बुद्ध, आंधळ्या गोष्टी आहेत. या पूर्वग्रहामधून व निवाड्यामधून स्वत:ला मुक्त केले पाहिजे.

आता बेडेकरांचेच उदाहरण घ्या. नरमेधाच्या आदिमकालीन विधीचा, प्रथेचा, यज्ञसंस्थेचा त्यांनी सहृदय पण चिकित्सक बुद्धीने अभ्यास केला. समूहाच्या विकीर्णतेवर मात करून एकत्वाची अनुभूती समूहाला देत, ऐक्याचे संभरण पुन:पुन्हा करणे हे त्याचे बुद्धीला समजण्यासारखे प्रयोजन होते. त्यांच्याही मध्ये एक विधायक प्रयोजन ग्रथित झालेले आहे, हे त्यांनी जाणले. त्यांनी हेही जाणले की ही मानवी समूहाची निरंतरची गरज असणारच आहे. आज सर्व संदर्भ बदलले असताना ही गरज भागविण्याच्या रीती, विधी कोणत्या अंगीकारणे योग्य होईल, अखिल मानवजातीला सामावून कसे घेता येईल हा विचार त्यांनी केला. त्याच जुन्या नरमेधाच्या चालीचे वा यज्ञयागाचे पुनरुज्जीवन करण्याची गोष्ट त्यांनी अजिबात सुचविली नाही. तात्त्विक व व्यावहारिक विचार करून त्यांनी नव्या धर्मप्राय श्रद्धेच्या पुनर्लाभाची आवश्यकता प्रतिपादिली.

आज आपल्याला ज्या रूढी, प्रथा, विधी, कर्मकांड, समजुती इत्यादी रानटी, हिंस्र, अडाणी, निर्बुद्ध असल्याचे ठाम, पक्केपणाचे वाटते त्याही आत्मभान व जाणीवसंपन्न माणसांनी व्यक्ती व समूह यांच्या भल्याचा विचार करून, बुद्धीचा वापर करून विवेकाच्या पायावर एकेकाळी प्रसृत केल्या ही जाण प्रकट करण्यात बेडेकरांची जी सहृदयता व त्यांचा जो विनीतभाव दिसून येतो, मानवमात्राविषयी जी समदृष्टी व आदरभाव ते व्यक्त करतात तोच आपणा सर्वांसाठी आदर्शभूत

आहे.

मानवजातीला एका नव्या अर्थाने, 'मानुष' धर्मश्रद्धेचा—'धर्मप्राय श्रद्धे'चा—लाभ व्हायला हवा असे मलाही म्हणावयाचे आहे. अशा नव्या धर्मश्रद्धेचा लाभ ज्यांना झाला होता, आणि ज्यांच्या व्यक्तिगत जीवनात व अत्यंत क्रियाशील सार्वजनिक कार्यात अशी धर्मश्रद्धा प्रकट झालेली आपणास आढळते अशी माणसे भारतात अलीकडच्या दोनशे वर्षांमध्ये होऊन गेली हे आपले मोठे सद्‌भाग्य आहे. या सर्व व्यक्ती ही हाडामांसाची माणसे होती. तेव्हा, ती एकछाप नाही आढळली तर आश्चर्य वाटायला नको. त्यांच्यात आपल्याला काही उणेपणही आढळले तर तो त्यांचा माणूस असल्याचाच भाग होता. त्यांचे त्यांचे अजोड वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्व आपण जाणून घ्यायला हवे. येथे मी काहींची नावे घेणार आहे, पण याचा अर्थ एवढीच व हीच माणसे अशी होती असे नाही. महात्मा फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई, रामकृष्ण परमहंस, त्यांचे सत्‌शिष्य स्वामी विवेकानंद, गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, दीनबंधू अँड्र्यूज, खान अब्दुल गफार खान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, एसेम जोशी, चौदावे दलाईलामा इत्यादी. ज्याची त्याची यादी वेगळी असेल व ती गोष्ट स्वाभाविक आहे. ही नावे घेण्यात मला मुद्दा एवढाच स्पष्ट करावयाचा आहे की बेडेकरांनी ज्या 'धर्मप्राय श्रद्धे'च्या पुनर्लाभाची गोष्ट केली ती धर्मश्रद्धा ही केवळ कपोलकल्पित गोष्ट नाही. तो एक जिवंत, प्रेरक व समर्थ असा वाहता झरा आहे.

आज भारतावर व जगावरच धार्मिक-सांप्रदायिक कट्टरतेचे, दहशतवादी हिंस्र उन्मादाचे मळभ दाटून आले आहे. फॅसिस्ट शक्ती असे यांचे वर्णन करता येईल. या शक्ती प्रलय घडवून आणणार की काय, असे भय आपल्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. बेडेकरांनी 'नव्या धर्मश्रद्धे'चा जो आशय व आकार आपणा सर्वांसमोर तीस-बत्तीस वर्षांपूर्वी प्रकट केला त्या 'धर्मप्राय श्रद्धे'च्या आधारे घडणाऱ्या नम्र व सहृदय कृतींमुळेच हे संकट निवारले जाईल अशी मला खात्री आहे. अशा कृती अविश्रांतपणे, बेडेकरांइतक्या सहजसाध्य प्रसन्नपणे करण्याचे सामर्थ्य व धैर्य आपणा सर्वांना लाभो ही प्रार्थना.

❑❑❑

## वसंत पळशीकर

जन्म : १८ फेब्रुवारी १९३६. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे सहायक म्हणून ग्रामदान चळवळीत कोरापूट येथे काम. काही वर्षे अच्युतराव पटवर्धन आणि रावसाहेब पटवर्धन यांचे लेखनिक. १९६७ साली 'समाज प्रबोधन पत्रिके'चे संपादक म्हणून महाराष्ट्राला परिचित. काही काळ 'नवभारत'चे संपादक. महाराष्ट्रापुढील आणि देशापुढील महत्त्वाच्या समस्यांविषयी वेळोवेळी विपुल लेखन. भारतीय समाजाची आजपर्यंत होत आलेली घडण आणि वर्तमान प्रश्न हा आस्थाविषय. १९९७ साली 'महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार'.

**प्रकाशित साहित्य :**

'सत्याग्रही सॉक्रेटिसचे वीरमरण', 'जमातवाद' हे ग्रंथ आणि बी. आर. नंदा यांच्या गोपाळ कृष्ण गोखले चरित्राचे मराठीत भाषांतर. मे. पुं. रेगे यांच्या लेखांचे—'विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा' या ग्रंथाचे—संपादन.

आज भारतावर व जगावरच धार्मिक-सांप्रदायिक कट्टरतेचे, दहशतवादी हिंस्र उन्मादाचे मळभ दाटून आले आहे. फॅसिस्ट शक्ती असे यांचे वर्णन करता येईल. या शक्ती प्रलय घडवून आणणार की काय, असे भय आपल्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. बेडेकरांनी 'नव्या धर्मश्रद्धे'चा जो आशय व आकार आपणा सर्वांसमोर तीस-बत्तीस वर्षांपूर्वी प्रकट केला त्या 'धर्मप्राय श्रद्धे'च्या आधारे घडणाऱ्या नम्र व सहृदय कृतींमुळेच हे संकट निवारले जाईल अशी मला खात्री आहे. अशा कृती अविश्रांतपणे [illegible] सहजसाध्य प्रसन्नपणे करण्याचे सामर्थ्य [illegible] सर्वांना लाभो ही प्रार्थना.

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 P 187 D
00124285

मूल्य : १० रुपये

ISBN 81-88284-60-2